मासिक

# शिक्षण यात्री



आदरणीय,
गुरूजी (सर)
स.न.वि.वि.

दुसऱ्या सत्रातले पहिलेच पत्र पाठवतोय. सुटी नंतर म्हणा ना. सुटी कशी आली नि कशी भुर्रकन निघुन गेली कळलंच नाही. ईलेक्शनचा थकवा निकालाची उत्सुकता, नंतरचा गोंधळ यामुळे दुरचित्रवाणी समोरून उठू वाटलेच नाही. यंदा कुठे सहपरिवार फिरायला गेलात की नाही? असो.

आता शाळा सुरू झाल्यानंतर दुसऱ्या सत्राची सुरूवात तशी धिमी झाली. आता मात्र कामाला वेग आलाय. हा डिसेंबर-जानेवारी तसा धावपळीचाच.

सहल संमेलन - अहो, सहलीचे नियोजन सोपे असते का? किती जबाबदारी असते हो. त्यातच आता सहलीची परवानगी मिळते वेळीच्या अटी-शर्ती पहाता, कागदपत्रे पहाता सहल नकोच । असं वाटू लागलय. मुलांच्या आनंदासाठी, शिक्षणासाठी सहल गरजेची. मात्र जाचक अटींना सामोरे जायला जीव आता होत नाही. सहलीऐवजी जवळच वनभोजन, क्षेत्रभेट केलेली परवडते.

गुरूजी, शाळेत परसबाग आहे काय हो? आता परसबाग असली म्हणजे बक्षीस मिळणार आहे म्हणे. बहुतांश शाळांमध्ये परसबाग झाल्या आहेत. व्हॉटस ॲप च्या माध्यमातून प्रतिमांचं (फोटो) दर्शन होतंय. ताज्या भाज्या आपल्या पोषण आहारात शिजवायला मदत होतेय. मुलांनाही बागेत काम करायला आवडते. आवडीने सर्व कामे करायला पुढाकार घेतात. विविध संस्कारांची, मूल्यांची रूजवणूक व्हायला मदत होतेय.

काय? अवघड वाटतंय? परसबागेने चिंता करू नका गुरूजी. हो एखादे काम अजून वाढलेय म्हणा ना. अडचणी तर खुप आहेत. मात्र एखादा सर्जनात्मक उपक्रम करून पाहुयात. अडचणी आणि आपण हे तर समीकरणंच झाल आहे.

गुरूजी, या अंकात परसबागेचे लेख दिले आहेत. नक्की वाचा.

विनोबा भावेचं शिक्षण विचार पुस्तक वाचून नीला आपटे ताईंनी लेखमालाच पाठवलीय. सुंदर विचारांच दर्शन घडणार यात शंका नाही.

असो. बाकी काही नाही. काही सांगायचे, सुचवायचे असल्यास कळवा. लिहून पाठवा.

नमस्कार.

आपलाच
शिक्षणयात्री

**शिक्षकांचे हक्काचे व्यासपीठ**
वर्ष : ४ थे
अंक: ६ वा डिसेंबर २०१९

• सह संपादक •
सुभाषदादा कुलकर्णी

• मुखपृष्ठ •
परसबागेतील विद्यार्थी

• मांडणी •
प्रगती आर्टस्,शिरपूर ९४२२२३३२९४

लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी

• कायदेशीर सल्लागार •
ॲड.शाम पाटील

पी.आर.बी.ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्यकारी संपादकांवर.

• संपर्क •
शिक्षणयात्री
क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे
चलभाष : 8208301001
shikshanyatri11@gmail.com

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.

# विनोबांची प्रयोगशील जीवनयात्रा



**नीला आपटे**
विनोबा आश्रम
गागोदे
९४०५९२४२२७.

विनोबा भावे एक दूरदर्शी तत्ववेत्ता, शिक्षण तज्ञ, क्रांतिकारक संत, वैश्विक मूल्ये स्वत:च्या जीवनात उतरविण्यासाठी निरंतर झटणारा अध्यात्मिक आणि तितकाच विज्ञाननिष्ठ संशोधक, अत्यंत विरक्त जीवन जगणारा, पण ज्यांच्या विचारांच्या किंवा साहित्याच्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपलंसं करुन सोडणारा, आजन्म ब्रम्हचारी, अनेकांना पितृतुल्य असल्याने 'बाब' या नावाने संबोधिला जाणारा, महात्मा गांधीजींनी ज्यांचा अध्यात्मिक वारसदार म्हणून उल्लेख केला असा एक ऋषितुल्य माणूस. विनोबांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त त्यांचा जीवनपरिचय करूण देणारी ही लेखांची मालिका .

काही जण त्यांचा उल्लेख आधुनिक संत म्हणून करतात, त्यांची अध्यात्मिक बाजू किती महत्त्वाची आहे ते मांडतात, काहीजण त्यांना सामाजिक क्रांतीकारक म्हणतात, त्याच्या भूदान आंदोलनाने केवढी मोठी क्रांती केली हे आवर्जून सांगतात. काहीजण विनोबांनी आणीबाणीच्या काळात न घेतलेल्या भूमिकेमुळे त्यांच्यावर टीकास्त्र सोडतात, तर काहीजण त्यांनी मांडलेला लोकनीतीचा विचार किती दूरदर्शी व शाश्वत राजकारणाचा विचार आहे हे सांगतात. या सगळ्या विचारातून आपल्याला जाणवते ते विनांबांचे बहुआयामी जीवन आणि विचार. त्यांच्या जीवन आणि विचारात जेवढे खोल डोकवावे, तेवढे वेगवेगळे पैलू आपल्याला दिसायला लागतात आणि जाणवतं की आपल्याला विनोबा अजून बरेच कळायचे बाकी आहेत, त्यांच्याविषयी आपलं कुतूहलही अधिकाधिक वाढत जातं आणि त्यांच्या जीवनाचे एक एक पदर आपण उलगडत राहतो. या आपण मध्ये मी खऱ्या अर्थाने सहभागी झाले ती १२ – १५ वर्षांपूर्वी. त्यापूर्वी विनोबांचे नाव माहीत होते, त्यांच्या भूदान यात्रेविषयी थोडं वाचलं ऐकलं होतें. सर्वोदय विचार, पवनार आश्रम,गागोदे या त्यांच्या जन्मगावी असलेला विनोबा आश्रम, यांचा थोडाफार परिचय होता. त्यांचे मधुकर, गीता प्रवचने, विचार पोथी वगैरे साहित्य वाचनात आले होते, पण खऱ्या अर्थाने विनोबा माझ्या मनात घर करुन राहिले ते त्यांचे शिक्षण विचार हे पुस्तक वाचले तेव्हा. त्यांचे शिक्षण विषयक विचार वाचले आणि माझ्या डोक्यात लख्ख उजाडल्यासारखे वाटले. शिक्षण क्षेत्रात काम करत असताना जे काही अनुभव येत होते, ज्या समस्या जाणवत होत्या, ज्या कल्पना मनात येत होत्या, त्या सर्वांविषयी विनोबांनी पूर्वीच लिहिलेले आहे याची प्रचिती आली. शिक्षणाला एक वेगळी दिशा देण्याची ताकद विनोबांच्या विचारात आहे असे जाणवले आणि त्यांचा विचार व्यवहारात कसा उतरवता येईल, आताच्या काळाला सुसंगत अशी त्याची मांडणी कशी करता येईल याचा विचार मी करु लागले.

विनोबांचा शिक्षण विचार हे केवळ तत्वज्ञान नाही तर त्यांनी स्वत: अनुभवलेले सिद्ध केलेले ते एक शास्त्र आहे. जो जो विचार त्यांच्या मनात आला तो तो विचार आचरणात आणण्याचा त्यांचा निग्रह असे. त्यामुळेच त्यांचे विचार हे त्यांच्या जगण्यातून तावून सुलाखून निघालेली सत्ये आहेत; शाश्वत, सार्वत्रिक आणि सर्वसमावेशक. विनोबांचे जीवन हीच एक प्रयोगशाळा होती जणु. अगदी लहानपणापासूनच प्रत्यक्ष प्रयोग करुन अनुभव घेण्याचा व कृतीतून शिकण्याचा त्यांचा स्वभाव होता.

आठ वर्षाचे असताना ते बडोद्यात शिकण्यास गेले. लहानपणापासूनच स्वदेशीचा विचार व देशप्रेम त्यांच्या मनात रुजत होते. आपल्या जीवनात स्वदेशीचे मूल्य जपण्याचा त्यांचा कसोशीने प्रयत्न चालला होता. एकदा घरातील कंदिलाची काच परदेशी आहे असे लक्षात आल्यावर त्यानी ती फोडून टाकली होती आणि त्यासाठी वडिलांचा मारही खाल्ला होता. आपल्या देशात, उन्हाळी प्रदेशात, विशेषत:

कोकणात, कमीत कमी कपडे वापरण्याची पद्धत आहे. ब्रिटिशांचा अंगभर पेहराव त्यांना अजिबात रुचत नव्हाता. त्यामुळे तथाकथित शिष्टाचाराला न जुमानता, ते महाविद्यालयाच्या वाचनालयातही उघडे राहात असत. याविषयी ब्रिटिश ग्रंथपालाने त्यांना हटकले असता, स्वत: खुर्चीवर बसून व समोरच्या माणसाला उभे ठेवून बोलणे हे भारतात सौजन्याचे मानले जात नाही. असे ठणकावून सांगत भारतीय शिष्टाचाराचा धडाच सुनावला होता. मनाला पटेल ते अमलात आणण्याचे धाडस त्यांच्या त होते. लोकलाजेस्तव किंवा लोकाग्रहास्तव आपल्याला अनुचित वाटणारे किंवा न पटणारी गोष्ट त्यांनी कधीच केले नाही. त्यांचा स्वभाव असा अंतर्बाह्य निर्भय होता. केलेला निश्चय निष्ठेने पाळणं हा विनोबांचा जणू स्थायीभाव होता. वयाच्या चौथ्या वर्षी उपनयन संस्काराच्या वेळेस त्यांनी आजन्म बह्मचर्य पाळण्याचा निश्चय केला होता आणि तो त्यांनी खरोखरच आजन्म निष्ठापूर्वक पाळला. वयाच्या सतराव्या वर्षी विनोबांनी गृहत्याग करण्याचा निश्चय केला. लहानपणी केलेल्या ब्रम्हचर्याचा निश्चयाचे बळ ही सोबत होतेच. घराच्या सुरक्षित भिंती ओलांडून बाहेर पडल्यावर प्रतिकूल परिस्थितीत निभाव लागावा यासाठी ची तयारी विनोबांनी आधीपासूनच सुरु केली होती. व्यायाम, गादीवर न झोपणे,चप्पल न घालणे,थंड पाण्याने जेव्हा अंघोळ अशा गोष्टींची सवय त्यांनी आधीपासूनच स्वत:ला लावून घेतली होती. आधारित जीवन जगण्याचा त्यांचा प्रयोग हे असाच कष्टप्रद परंतु निष्ठाधिष्ठित होता.

वाई येथे जवळजवळ तेरा महिने ते वास्तव्यास होते. त्यावेळेस त्यांनी गीता, उपनिषद व इंग्रजी यांचे वर्ग चालविले. या वर्गातील विद्यार्थ्यांना घेऊन विद्यार्थी मंडळ सुरु केले. विद्यार्थी मंडळाचे वाचनालय स्थापन केले. त्याच्या खर्चासाठी ते लोकांची दळणं दळून देत असत, रोज सहा ते आठ शेर धान्य ते दळत असत, विनोबांनी स्वत:वर आहाराचेही अनेक प्रयोग केले. सहा महिने मीठ सोडले, काही दिवस दूध सोडले, एक महिना दूध, केळी व लिंबू एवढाच आहार घेतला, ११ पैशात आपला आहार बसविण्याच्या नादत केळी व लिंबू- चार पैसे, ज्वारी -दोन पैसे, दूध- पाच पैसे, असा मर्यादित आहार ते घेऊ लागले.

विनोबांनी अर्थशास्त्राचे अध्ययन सुरु केले तेव्हा, भारतातील लोकांचे कमीत कमी उत्पन्न दिवसाला दीड ते दोन आणे इतके होते. तेव्हा विनोबांनीही आपला रोजचा आहार दोन आण्यात भागविण्याचा निश्चय केला. इतक्या कमी रकमेत रोजच्या आहारात जोंधळ्याची, शेंगदाणे, गूळ, डाळ, मूळभर भाजी, थोडे मीठ व चिंच एवढेच ते खात असत, या दरम्यान ते दिल्लीला गेले होते. तेव्हा तेथे महागाई असल्याने त्यांनी शेंगदाणे आपल्या आहारातून वगळले, परंतु दोन आण्यात जेवण भागविण्याचा आपला निश्चय कायम ठेवला.

विनोबांनी आरोग्य सुधारण्यासाठी स्वत:वर खूप प्रयोग केले. रोज दहा ते बारा मैल चालणे, तीनशे सुर्यनमस्कार घालणे. असा नित्यनियम केला. साबरमती आश्रमात वस्त्र निर्मितीचे काम सुरु झाले तेव्हा विनोबा प्रामुख्याने विणकाम करीत असत.एका दिवसात पंचवीस वार नवार विणून त्यावर निर्वाह होऊ शकेल का हे तपासून पाहण्यासाठी एकदा विनोबा सलग दहा तास नवार विणत बसले होते. दहा तासात त्यांनी पंचवीस वार नवार विणली. विनोबांनी कापूस पिंजणे, पेळू बनविणे, सूतकताई, विणकाम अशी सर्वच कामे तासनतास केली. गांधीजींचा रोज नेमाने सूतकताई करण्याचा आग्रह त्यांना तसा मान्य नव्हता. परंतु गांधीजींनी त्याविषयी नाराजी व्यक्त केली, तेव्हा त्यांनी गांधीजींना, बारा वर्षे सलगपणे रोज एक तास सूतकताई करण्याचा निश्चय कळवला आणि आजारपणातही या कामात खंड पडू न देता आपला निश्चय पूर्ण केला. आश्रमातील सर्व प्रकारची स्वावलंबनाची व कष्टाची कामे विनोबा निष्ठेने व जबाबदारीने पूर्ण करीत असत. एक दिवस अँड्र्यूज हे आश्रमात आलेले असताना, विनोबांची ओळख करुन देताना गांधीजी म्हणाले होते, ''हे म्हणजे संपूर्ण आश्रम आहेत.''

मैलोनमैल पायी चालण्याचे विनोबांना काहीच विशेष वाटायचे नाही. रोजचे दहा-बारा मैल चालणे हे ठरलेलेच शिवाय अनवाणी चालण्याचा त्यांचा निश्चय होता. जवळ जवळ संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी अनवाणी पायी प्रवास केला. ऊन्ह, पाऊस, कशाचीही तमा न बाळगता, कडक उन्हात अनवाणी चालल्यामुळे त्यांची दृष्टीही कायमची अधू झाली

होती.परंतु चष्माही न वापरण्याचा त्यांचा नियम होता. त्यांच्या अशा कष्टदायक नियमांविषयी गांधीजींना कळले, तेव्हा गांधीजींनी विनोबिंना सरळ आदेश दिला.तेव्हापासून ते चप्पल व चष्मा वापरु लागले.

विनोबांच्या पुढाकारामुळे वर्ध्याचा आश्रम म्हणजे जणु कातण्या-विणण्याची प्रयोगशाळाच बनला होता. खादी वस्त्र निर्मितीच्या प्रक्रियेतील सर्वच कामांमध्ये विनोबांनी असंख्य प्रयोग तरबेज होते. तकलीचा शोध त्यांनी लावला असे म्हणणेही वावगे ठरणार नाही. कताईची मजूरी निश्चित करण्याचे ठरले, तेव्हा त्यांनी सूतकताईने जीवननिर्वाह करण्याचा निश्चय करुन प्रयोग सुरु केला. गांधीजींनी त्यांना विचारलं की त्यांची रोजची मजुरी किती पैसे भरते, तेव्हा विनोबांनी त्यांना सांगितल की, रोजची मजुरी दोन आणे व रोजचा खर्च आठ आणे आहे. हे ऐकून गांधीजींनी त्वरित निर्णय घेतला आणि गांधीजींच्या सूचनेनुसार चरखा संघाने मजुरी वाढवून दिली. विनोबांच्या प्रयोगशीलतेमध्ये इतकी नैतिक निर्णायक ताकद होती.

नालवाडी वर्धा येथील दलित वस्तीत विनोबा राहायला गेले तेव्हा त्यांनी सर्वप्रथम भंगीकाम सुरु केले. त्याकाळी दलित भंगीकामाला कमी लेखत असत. त्यामुळे दलित वस्तीत राहिल्यामुळे सवर्णांनी आणि भंगी काम करतात म्हणून दलितांनी, विनोबा व त्यांच्या सहकाऱ्यांना वाळीत टाकले होते. परंतु सर्वांचा रोष पत्करुनही त्यांनी आपले श्रमप्रतिष्ठा व अस्पृश्यता निवारणाचे मूल्य निष्ठेने जपले, खरं तर गांधीजी व त्यांच्य अनुयायांनी अस्पृश्यता निवारणासाठी निवडलेला हा एक मार्ग होता. जी कामे समाजोपयोगी व अनिवार्य आहेत, परंतु समाजात त्यांना प्रतिष्ठा नाही, ती कामे उच्चभू समाजातील लोकांनी करावीत. प्रतिष्ठित समाजातील लोकांनी ही कामे केली तर आपोआपच या कामांना सामाजिक प्रतिष्ठा मिळेल व अस्पृश्यता नष्ट होईल असा यामागचा विचार होता.

गांधीजींनी व्यक्तिगत सत्याग्रहातील पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली होती. त्या सत्याग्रहात विनोबांनी एकूण नऊ महिने तुरुंगवास भोगला तुरुंगात असतानाही त्यांची दिनचर्या आश्रमा सारखीच असायची . पहाटे उठणे, सकाळ-संध्याकाळी प्रार्थना, गीता- संस्कृत शिकवणे, सूतकताई असे सर्व कार्यक्रम तुरुंगातही अव्याहतपणे सुरु असत, कारण त्यांचा तसा निर्धारच होता.

विनोबांचा अत्यंत महत्तवाचा प्रयोग होता तो भूदान यज्ञाचा. समाजात क्रांती आणणारा तो प्रयोग होता. जो जो शेतीत कष्ट करतो, राबतो, त्याला हक्काची जमीन देण्याचा तो प्रयोग होता. विनोबा म्हणायचे, हे केवळ दान नाही, तर यज्ञ आहे, दान हे फक्त श्रीमंत माणूस करतो, पण यज्ञात लहान-थोर कोणीही सहभागी होऊ शकतो. विनोबा लोकांना नम्रपणे आवाहन करीत. उत्पन्नाचा सहावा भाग राजाला दिला जातो. तुम्ही तुमच्या जमिनीचा सहावा भाग दरिद्रनारायणास द्या. कधी म्हणत, कर्ण हा सहावा पांडव होता. त्याचा राज्यसत्तेतील हिस्सा नाकारला गेला आणि महाभारत घडले. आजचा भूमिहीन हा सहावा पांडव आहे. त्याला न्याय द्या जमिनीचा त्याचा हिस्सा त्याला द्या. नाहीतर रक्ताचे पाट वाहतील. विनोबांच्या शब्दात, वाणीत मोठीत ताकद होती. केवळ शब्दांच्या माध्यमातून विनोबांनी जनतेला जमीन देण्याची हाक दिली आणि त्यांच्या हाकेला प्रतिसाद देत लोकांनी ४७ लाख एकरापेक्षा जास्त जमीन दान दिली. विनोबा तेरा वर्षे सातत्याने लोकांना भूदान यज्ञामध्ये जमिनीची आहुती देण्याचे आवाहन करत भारतभर पायी हिंडले, पदयात्रा केली. भूदान यात्रेत विनोबा इतके चालले, की त्यानी तेवढे चालून अखंड पृथ्वीला तीन वेळा प्रदक्षिणा घातली असती.

भूदानाच्या पुढे जाऊन विनोबांनी ग्रामदानाचा विचार मांडला.सब भूमी गोपाल की या न्यायाने जमिनीवरच्या हक्काचे विसर्जन करावे व संपूर्ण जमिनीवर गावाचा सामूहिक मालकी हक्क राहावा असा तो विचार होता. विनोबांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत, एकट्या महाराष्ट्रात वीस गावे ग्रामदानी झाली. भूदान-ग्रामदान यज्ञ हा विनोबांच्या जीवनातील सर्वात मोठा अहिंसक सामाजिक क्रांतीचा प्रयोग होता. चंबळ खोऱ्यातील डाकूंचे मनपरिवर्तन करुन त्यांना शरण यायला भाग पाडणे, ही विनोबांच्या आत्मिक व अध्यात्मिक बलाची कसोटीच होती.

असे होते आचार्य विनोबा भावे, विज्ञान आणि आत्मज्ञान दोन्हींशी अतूट नाते जोपासणारे,वैज्ञानिक व अध्यात्मिक सिद्धांत प्रत्यक्ष आचरणातून सिद्ध करुन दाखविणारे, महान कर्मयोगी, कर्मनिष्ठ जीवन यात्री!

# परसबाग



**सुरज ज्वाला भामरे**
चंदगड ता. कोल्हापूर
९०४९४१९२९०





परस म्हणजे अंगण आणि या अंगणात फुलवलेली भाजीपाल्याची बाग म्हणजे परसबाग. परसबाग महत्त्वाची जागा असते. कारण भाजीपाला हा एकमेव स्त्रोत आहे जो आपल्या आहारामध्ये पोषण देतोच,चवीची/स्वादाची देखील वाढ करतो. संतुलित आहारासाठी एक व्यक्तीला दररोज ३०० ग्रॅम भाजीपाल्याची आवश्यकता असते. परंतु आपल्या देशात भाजीपाल्याच्या उत्पादनाचा विचार केला तर एका व्यक्तीला दररोज फक्त १२० ग्रॅम भाजीपाला मिळू शकतो. म्हणजे आपल्या गरजेएवढा भाजीपाला घ्यायचे ठरवले तरी तो आपण आपल्या आहारात, समाविष्ठ करु शकत नाही.यासाठी ग्रामीण भागातील शाळा, विद्यार्थी, शेतकरी यांच्यात परसबागेविषयी जागृती करायला हवी. शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या एका कोपऱ्यात परसबाग तयार केली पाहिजे, हि कामे रोजच्या कामातून थोडा वेळ काढून केल्यास आपले मन प्रसन्न राहते. तसेच मजुरीचीही बचत होते.

वरील सत्य गृहीत धरुन आपण आपल्या कुटुंबाच्या गरजेनुसार,शाळेतील विद्यार्थी संख्येनुसार ताजा स्वच्छ किटकनाशकविरहित भाजीपाला आपल्याच शालेय आवरात घेतला पाहिजे.या बागेत सर्व प्रकारच्या म्हणजे पालेभाज्या,फळभाज्या, वेलवर्गीय,कंदमुळे तसेच औषधी वनस्पती, फळझाडे,फुलझाडे. यांचा समावेश केला पाहिजे. परसबागेसाठी ज्या ठिकाणी भरपूर सूर्यप्रकाश आहे, अशी जागा निवडावी.शाळेतील सांडपाणी भाजीपाल्यांच्या वाफ्याच्या दिशेने वळवावे.परसबागेसाठी जमीन किती उपलब्ध आहे. तसेच शाळेत किती विद्यार्थी आहेत, यावरही अवलंबून असते. परसबागेसाठी कोणता आकार निश्‍चित केलेला नाही, परंतु चौकोनी आकार सहसा करतात, परसबागेच्या उत्तर बाजूस किंवा कुंपणाच्या कडेने उंच वाढणारी झाडे लावावीत, जेणेकरुन त्याची सावली भाजीपाल्यावर पडणार नाही व उन्हाळ्यात गारवा निर्माण होईल. एकाच वेळी सर्व भाज्यांची लावणी न करता त्यांचा पुरवठा सतत होण्याकरिता त्यात काही अंतर ठेवावे, जेणेकरुन खंड न पडता भाजीपाला मिळत राहिन. आपल्या आहारात विविधता आणण्याकरिता काही विदेशी भाजीपाल्यांचाही उदा.झुकीनी,ब्रोकोली,ब्रसेल्स स्प्राउट्स, चेरी टमाटे,पिअर टमाटे,गोल्डन टमाटे, चायनीज कोबी इ. परसबागेत समावेश करावा, या विदेशी भ़ाज्यांना बाजारातदेखील चांगला भाव मिळतो, आपल्या परसबागेच्या आवडीला आपण व्यवसायाची देखील जोड देऊ शकतो.

परसबाग उपलब्ध जागेत तयार करता येते. तिला जागेची



किमान वा कमाल मर्यादा नसते.

विटा,मोठे दगड किंवा मातीचे वाफे तयार करावे. प्लास्टिकचे मोठे ट्रेही वापरता येतील.

भाजीपाल्यानुसार जागेचे वर्गीकरण करा.ज्या भाज्यांची मुळे लहान आहेत, अशा भाज्या वाफ्यांमध्ये घ्याव्यात, ज्यांची मुळे लांब आहेत अशा भाज्या बकेटमध्ये घ्याव्यात.

वेलवर्गीय भाज्या भिंतीच्या दिशेने घ्याव्यात, या भाज्यांसाठी गार वेगळा मांडव केल्यास वेलींना जास्त भाजीपाला लागतो.

जनावरांपासून संरक्षणासाठी उपलब्ध साहित्याचे कुंपण करावे.

बियाणांवर खर्च फक्त एकदाच करावा.नंतर भाजीपाल्यांचे बी वाळवून परत ते वापरावे.

**भाज्यांचे वर्गीकरण**

**पालेभाज्या-** पालक, मेथी, शेपू, चुका, कोथिंबीर, माठ, तांदूळजा, अळू, घोळ,

**फळभाज्या-** मिरची, टमाटे, वांगी, गवार, चवळी, भेडी, फुलकोबी.

**वेलवर्गीय-** कारले, दोडके, दुधीभोपळा, लाल भोपळा, काशीफख, काकडी, वाल.

**औषधी-** अक्कलकाढा, पुदिना, तुळस, गवती चहा, कोरफड, वावडिंग पुदिना.

फुलझाडे-मोगरा, जास्वंद, गुलाब, जाई, जुई, चमेली, काकडा, गलांडा.

**परसबागेसाठी सेंद्रिय खत-**

परसबागेसाठी जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचाच वापर करावा, ज्यामुळे भाजीपाल्यातील पोषणमूल्ये कमी होणार नाहीत.

सहज उपलब्ध होणारे व तयार करण्यास सोपे खत म्हणजे सेंद्रिया खत. आपल्या घरातील जुन्या माठामध्ये किंवा फुटलेल्या टाकीत सेंद्रिय खत तयार करता येते.

**सेंद्रिय खत तयार करण्याची पध्दती -**

अएका माठामध्ये सर्वात खाली नारळाच्या जटा टाकाव्यात, ज्यामुळे माठात ओलावा कायम राहतो.त्यानंतर त्यावर काडीकचरा, अर्धवट कुजलेले शेण व माती असे ६-६ इंचाचे थर करावे, सर्वात वर ओले शेण पाण्यामध्ये मिसळून टाकावे. साधारण:३-४ दिवसांनी त्यात २०-२५ गांडुळे सोडावी. हा माठ एका बकेटवर ठेवावा, ज्यामुळे ४५ दिवसांनी तुम्हाला गांडूळखत व गांडूळपाणी देखील मिळेल.ह्याचे सुंदर कंपोष्ट खत तयार होते. त्यामुळे आपल्याला कचरा लांबवर न्यावा लागत नाही. व घाणही येत नाही. ह्यासाठी शाळेतील कोणताही कोपरा निवडला तरी चालेल.

औषधे वापरल्यास नियमित दोन औषधांचा वापर करावा.औषध दर आठवड्याला नियमितपणे मरावे. ह्यासाठी सोपा उपाय म्हणजे शेणीची राख भुरभुरावी, तंबाखूचे पाणी, गोमूत्र ह्याचा पंपाने स्प्रे करावा. म्हणजे औषधापासून होणारा त्रास वाचेल, परंतु जर अगदीच इलाज चालला नाही तर मात्र रोगोर किंवा मॅलेथीऑन वापरावे. सध्याच्या दिवसात बाजारात मिळणाऱ्या भाज्या अतिशय महाग तर असतातच शिवाय त्या शिळ्या सडक्या, जूनही असतात. ताज्या भाज्या मिळणं हा एक आनंद आहे आणि ताज्या भाज्या खाणं हे आरोग्याच्या दृष्टीने आवश्यकही आहे. तेव्हा आपल्या छोट्याशा परसात चारदोन प्रकारच्या

भाज्या लावल्यात तर हा आनंद आणि आरोग्य तुम्हाला निश्चितच मिळत राहिल.

**भाजीपाल्याची निवड :**

एका कुटुंबाला वागी,मिरंची, कढीलिंब, कोथिंबीर, आळू, टोमॅटो, लिंबू, पालेभाज्या,कढीपत्ता इ.भ़ाज्या लागतात.छोट्या कुटूंबाला चार ते सहा वांगी व मिरचीची झाडे, एक कढीलिंबाचे, एक दोन केळीची,एक दोन पपईची झाडे पुरेशी होतात.

मिरची व वांगी यांची झाडे वर्षभर टिकणारी आहेत. त्यामुळे त्यांच्या वाफ्याच्या वरंब्यावर कोथिंबीर,मेथी किंवा मुळा,कांदा लसूण, गाजर आदी भाज्या घ्याव्यात.धने व मेथी दर आठवड्याला टाकली तर त्याचे नियमितपणे उत्पादन मिळू शकते.

लिंबाचे झाड थोडे मोठे होते. त्यामुळे पुरेशी जागा असेल तरच ते लावावे. कढीपत्ता लावण्यास पुरेशी जागा नसल्यास कुंडीतही तो घेता येतो.

दुधी भोपळा,दोडका,घोसावळी,कारली व इतर वेलभाज्या या घरावर,गॅलरीवर किंवा घराच्या कंपाउंडवर चढवून त्यांचे पीक घेता येते. तोंडली कंपाउंडच्या तारेवरही होऊ शकतात.

**हंगामनिहाय भाजीपाल्याची निवड :**

**पावसाळा-** (जून ते सप्टेंबर) : मेथी, पालक, चुका, दोडका, कारली, मुळा, भोपळा, गाजर,

**हिवाळा-** (ऑक्टोबर ते फेब्रुवारी ): गवार ,भेंडी, मिरची, टोमॅटो, वांगी, वाल, भोपळा, चवळी, मटार, फुलकोबी.

**उन्हाळा-** (मार्च ते मे):वांगी, काकडी, फुलकोबी, दोंडका इ.

**परसबागेचे महत्त्व :**

आवडीची भाजी व रोज ताजी भाजी मिळते.

ताज्या भाज्यांमुळे शरीरास भरपूर जीवनसत्त्वे व खनिजे मिळतात.

पैशाची बचत होते.उर्वरित भाजीच्या विक्रीमुळे आर्थिक उत्पन्न वाढते.

महिला बचत गटांसाठी हा एक सामूहिक लघुउद्योग होऊ शकतो.

**परसबागेतील ऑक्सिजन कॉर्नर :**

परसबागेतील ही नवीन संकल्पना आहे. घरासमोरील तुलसी वृंदावनाबरोबरच काही राखीव जागांमध्ये ऑक्सिजन कॉर्नर ही नवीन संकल्पना प्रत्यक्षात आणता येईल. त्यासाठी बियापासून जून-जुलै महिन्यात तुळशीची रोपे तयार करुन निवडलेल्या जागेमध्ये लागवड करावी जेणेकरुन दिवसभर कामावरुन थकून भागून आलेल्या घरातील सदस्यांसाठी ऑक्सिजन कॉर्नरमध्ये मन:शांती मिळेल.अलीकडे धकाधकीच्या व अतिशय व्यस्त असा युगामध्ये ही नवीन संकल्पना प्रभावी ठरत आहे; त्याचा समावेश आपल्या परसबागेत निश्चितच उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

भाजीपाला,फळझाडे आदी पिके लावून जागा शिल्लक राहिल्यास हिरवळ किंवा मुद्दामहून सोडलेल्या खुल्या जागेमध्ये झोपाळ्याची रचना करावी.त्यामुळे घरातील छोटी मुले व वृध्दांसाठी विरंगुळा होतो.

**लागवड करताना महत्त्वाच्या बावी :**

सांडपाणी व घरातील कचऱ्याचा योग्य वापर होईल अशा प्रकारे व्यवस्थापन करावे.

सांडपाणी जेथून येते ती जागा वर असावी व भाजीचा वाफा थोडा खाली असावा. म्हणजे सांडपाणी सहजपणे वाफ्याच्या बाजूला उतार असल्याने वाहू लागेल.

परसबागेतील माती घट्ट दाबून घ्यावी.त्या मातीत एक पन्हाळ काढवी. पन्हाळीत घाण अडकू नये यासाठी तिच्या कडेकडेने दगड गोटे किंवा मातीची कौले लावावीत. म्हणजे पाणी सतत भाजीच्या वाफ्यापर्यंत वाहत राहते.

परसबाग छोटी असावी, त्यामुळे तिचे व्यवस्थापन सोपे जाते.बागेत स्वच्छता राहिल अशापध्दतीने नियोजन करावे. शक्यतो बाहेरील मजूरांचा वापर करु नये.



# सांगवी बीट-
# आनंददायी रचनात्मक प्रकल्प

**डॉ.नीता सोनवणे**
शिक्षण विस्तार अधिकारी,
शिरपूर जि.धुळे
९४०३९१८९८४



कुठलीही योग्य कृती यशस्वी होण्यासाठी खूप धीर धरावा लागतो.त्यातही शिक्षण प्रवाहातील जुने प्रवाद लोकांच्या विशेषत: शिक्षकांच्या धारणा बदलायच्या असतील तर त्याकरता स्वत:ला सिद्ध करण्याकरता प्रयत्न करावे लागतात.गिजूभाई बधेकांनी दिवास्वप्नात म्हटले आहे की ज्या व्यक्तीनी जग बदललं त्याच्याप्रमाणेच आत्मविश्वास उत्साह आणि आल ध्येयासक्तीची आपल्याला आवश्यकता आहे.इतक्या उच्च प्रतीची ध्येयासक्ती प्राप्त होणे याकरता तयारी आहे की नाही यापेक्षा आपले काम करतांना केंद्रबिंदू पालक असावे असा विचार नेहमी मनात असतो.

साधारण मे.जून २०१९ मध्ये स्वेच्छेने वेगळे काम करायची इच्छा असलेल्या अधिकारी कर्मचारी व शिक्षक यांचेसाठी भरण्याकरता श्रळपज्ञ वॉटसअ‍ॅप वरील ग्रुपवर लिंक आली होती सहज करुन पहावे, याकरता ती भरली आणि लिंकनुसार एका राज्यस्तरीय प्रशिक्षणात औरंगाबाद येथे येण्याचे पत्र मिळाले. प्रकृतीच्या कारणाने जाणे मुश्कील होते पण आतून काम करण्याची इच्छा तर होतीच यातूनच माझे दोन जीवाभावाचे शिक्षक  नरेश कोळी व  उमेश परदेशी मदतीला धावलेत व थेट राज्यस्तरीय प्रशिक्षणाकरता २२ जुलै ते २४ जुलै या कालावधीत माझे प्रतिनिधी म्हणून औरंगाबाद येथे पोहोचलेत. विद्या प्राधिकरण पुणे आयोजित या प्रशिक्षणात दोघांनी सर्वप्रथम (joyful Education) समजून घेतले.आल्यानंतर प्राप्त पस्तिका, नियोजन याची चर्चा झाली आणि तत्कालीन गटशिक्षणाधिकारी पी.झेड.रणदिवे यांना प्रकल्प नियोजन सांगावे याकरता बीटमधील केंद्रप्रमुख, मी स्वत:प्रकल्प समन्वयक अशी तालुकास्तरावर सभा घेतली. बीटमधील सर्व जिल्हा परिषद शाळां मध्ये प्रकल्प राबवावयाचा असल्याने मुख्याध्यापकाची कार्यशाळा घेण्यात आली. त्यानंतर लगेचच इयत्ता पहिली व दुसरीला शिकवणाऱ्या शिक्षकाची कार्यशाळा घेऊन अखेरीस १ ऑगस्ट २०१९ पासून सांगवी बीटमधील ५५ शाळांमध्ये स्वेच्छेने शिक्षकांची प्रकल्प राबविण्यात सुरुवात केली.शाळापूर्व  तयारीकरता बीटमधील अंगणवाडीताईची ही कार्यशाळा घेतली होती.

**प्रकल्पाची उद्दिष्ट्ये :-**उद्दिष्यशिवाय काम करणे म्हणजे दिशाहिन प्रवास होतो. त्यानुसार प्रकल्प उद्दिष्टा नुलक्षून सुरु करण्यात आला.

१)अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टानुसार मुलांना अध्ययन अनुभव देणे.२) पाठ्यपुस्तकापलिकडे जाऊन अध्ययन अनुभव देणे.३) विद्यार्थ्यामध्ये एकविसाव्या शतकातील कौशल्य विकसित करणे.४) विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या अभिव्यक्तीच्या संधी उपलब्ध करुण देणे.

**प्रकल्पाचे चल :-** वरील उद्दिट्येनुसार कोणत्या चलाकरता काम करुया हे ठरवले.

१)मराठी भाषा २)  गणित ३)इंग्रजी भाषा ४) वर्ग वातावरण व शाळा वातावरण ५) परसबाग ६) शाळा व्यवस्थापन समिती व लोकसहभाग प्रकल्प ऑगस्टमध्ये सुरु झाला.योगायोगाने प्रकल्प सुरु होणे पूर्वीच बीटमध्ये साधारण जुलै मध्ये भाषा समन्वय व गणित याकरता  १ ली व २ री शिक्षकांची १ दिवसीय अत्यंत यशस्वी कार्यशाळा घेतली होती.त्यामुळे शासनाने पुरविलेल्या पेट्यांच्या मदतीने व इतर शैक्षणिक साहित्य वापर करुन भाषा व गणित अध्यापनाची मानसिक तयारी झालेली होती.यावर्षीच्या पावसाने ऑगस्ट/सप्टेंबर मध्ये तर जास्त जोर धरलेला होता.त्याचा फायदा घेऊन परसबाग हे चल उद्दिष्टानुरुप राबवायचे ठरले, अत्यंत उत्साहने काम यात झाले.

**सांगवी बीटमधील परसबागा :-** बीटमधून ५५

शाळांतून परसबागा तयार करण्याचे काम सुरु झाले. जागा उपलब्ध नसणे, कुंपण नसणे. अशा अनेक अडचणींवर मात करुन काम सुरु झाले. मुले व शिक्षकां पासून लोकसहभाग, शाळा व्यवस्थापकन समिती यांचा सहभाग मिळु लागला. आणि अचानकच अनामिक उत्साह निर्माण झाला.अवघ्या १५ ते २० दिवसात जमीन तयार होऊन रोपे लावून आमच्या परसबागा निर्माण झाल्यात. सुरुवात तर झाली परंतु अतिवृष्टी ने रोज नुकसान होत होते. माती, रोपे वाहून जात होती. रोपे सडत होते पण शिक्षक व मुले जोमाने काम करीत होते. बागा फुलु लागल्या. जोडीला वृक्षारोपणही झाले. शाळांवर भेट दिली की सर्वात आधी मुले परसबाग दाखवू लागलेत. ५५पैकी मधून अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान टाळता किमान ३५ ते ४० शाळा मध्ये परसबागा उत्तम फुलल्यात. रोज मला वेगवेगळे फोटो बघावयास मिळु लागलेत.

एके दिवशी अचानक डॉ.विद्या पाटील (प्राचार्य –डाएट धुळे) यांचा फोन आला व मी मुलांना व त्यांच्या परसबागांना भेटायला येत आहे. असा निरोप त्यांनी दिला. ठरल्याप्रमाणे आदरणीय मॅडम बीटमध्ये सुरु असणारे उपक्रम बघण्याकरता आल्यात. जिल्हा परिषद शाळा पनाखेड येथे भेट दिल्यानंतर (joyful Education) प्रकल्प समजून घेतला. परसबागेला भेट दिली. मुले व मॅडम यांच्यात खूप मोकळेपणी भरभरुन संवाद झाला. शिक्षक व मुले यांना किती सांगू असे झाले होते. मॅडमही तितकेच सहजतेने समजून घेऊन शाब्बासकी देत होत्या. बीटच्या कामास मॅडमांनी शुभेच्छा दिल्यात, सोबतच संपर्क अधिकारी डॉ.डी.बी.साळुंखे सरांनी ही प्रोत्साहितकेले.

आता नोब्हेंबर उजाडलाय आमच्या परसबागातून भाज्या येऊ लागल्यात. दुधी भोपळा, गंगाफळ, भेंडी, टोमॅटो, कोथिंबीर,कोबी,मिरची,गिलके अशा कितीतरी भाज्या आता येत आहेत.बाजारात जाऊन विकण्याइतके उत्पन्न नाही परंतु रोजच्या शाळेत शिजणाऱ्या आहारात आता अजून जास्त मजा येऊ लागली आहे.मुलांना स्वत: श्रम केल्याने या बागाचे कौतुक आहे. पालक व गावकरी जबाबदारी समजून परसबागा सांभाळत आहेत. शिक्षकांना साफल्याचा आनंद मिळत आहे. (क्वचित गावात शाळांचा भाजीपाला चोरीला गेल्याचेही अनुभव आले.)

या अनुभवातून काही बाबी आम्ही शिकलोत. पुढील वर्षी त्याचा विचार नक्की होईल. परसबागा निर्मिती करता कृषी विभाग आम्हात प्रशिक्षण द्यायला तयार आहे. पुढील वर्षी त आम्ही घेऊ काही शेतकरी रोपे ही देणार आहेत. मुले व ग्रामस्थ यांचेवर अजून संगोपनाची जबाबदारी टाकून सुरक्षप भिंत,काटेरी कुंपणे आधीच बनवता येतील या सर्वांचा विचार पुढील वर्षी नक्की करु.

**सांगवी बीटची ध्येये :-** ध्येयांनी वेड झालेले लोक मोठा बद्दल घडवून आणण्याची ताकद देऊ शकतील.

१)बीट प्रगत होणेकरता सदैव प्रयत्न.

२)प्रत्येक मुले हे माणूस म्हणून सक्षम बनावे.

३)पर्यवेक्षीय यंत्रणा व शाळा यांतील अंतर संपावे.

४)शिक्षक पर्यवेक्षिय यंत्रणा, शाळा समाज या सर्वांचे हित हे बालाकाच्या हिताशी जुळलेले असावे.

अशाप्रकारे आनंददायी रचनात्मक प्रकल्पात सांगवी बीटमधून प्रवास सुरु आहे. शिक्षणाधिकारी मनिष पवार जातीने लक्ष घालून आमच्या प्रकल्पात प्रोत्साहन देत असतात.गटशिक्षणाधिकारी एस्. सी. पवार व गटविकास अधिकारी शिदें यांच्या सदिच्छा व प्रोत्साहन आहे. खर म्हणजे हा प्रकल्प सुरु गतिशील असण्याचे सारे श्रेय बीटमधील सर्व चिमुकली पाखरे,सर्व मुख्याध्यापक, शिक्षक बंधू भगिनी केंद्रप्रमुख किशोर भदाणे,अनिल बावीस्कर, सिताराम वाडीले, दुर्गेश वाडीले सर्व गट साधन व्यक्ती यांनाच द्यावे लागेल.

एकाच वेळी (joyful Education) प्रकल्पासह गेल्या ३ वर्षापासून होणाऱ्या स्थलांतराचा सांख्यिकीय व कारणचिकित्सकतेचा अभ्यासही सुरु आहे. पुढील अंकात स्थलांतर या विषयावर स्वतंत्र मांडणी व भूमिका. स्पष्ट करण्याचा मानस आहे.अंत:स्फूर्तीने नवे मार्ग शोधायला हवेत. हे सर्व एखाद्या अंतिम ध्येयाचा ध्यास असल्याशिवाय होत नाही याच ध्यासाने प्रेरीत होऊन काम करण्याची इच्छा आम्हा सर्वांची आहे.

# स्वकष्टाचा आनंद



**श्रीकांत दिलीप अहिरे**
जि.प.शाळा कोकणगांव ता.साक्री जि.धुळे
७५८८७३६४८६

शालेय जीवनात मुलांना श्रम संस्कार मिळावे परिसर अभ्यास विषयांतील प्रात्यक्षिक अनुभवता यावे, शेतीकामची आवड निर्माण अन सर्वात महत्वाचे म्हणजे मुलांना शाळेविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठीआनंददायी रचनात्मक परसबाग हा उपक्रम राबवण्यात आला.

। पर्यावरण संवर्धनाचा एक भाग ।

। शाळेत फुलली परसबाग ।

या आमच्या कोकणगांव शाळेत विविध फळभाज्या, पालेभाज्या आणि फुलझाडे लावण्यात आली

परसबाग निर्माण करण्यासाठी सर्वात मोठा प्रश्न जागेचा होता. शाळेच्या परिसरामध्ये परसबाग तयार करायची आहे. शाळेच्या मैदाना व्यतिरिक्त अशी सुरक्षित जागा शोधणं महत्त्वाचं होतं. त्यासाठी अगोदर जागेची निश्चिती करावी लागली. किती जागेमध्ये आपल्याला परसबाग करायची याचा विचार केला. कच्चा कृती आराखडा कागदावर अगोदर करुन घेतला परसबागेसाठी आवश्यक योग्य सुपीक माती मिळावी म्हणून अगोदर मातीचे नमुने परिसरातल्या शेतातून गोळा केले. माती परीक्षण कसे करावे हे मुलांना सप्रयोग शिकवून योग्य मातीची निवड केली. नियोजित जागेत गादी वाफे तयार करुन घेतले त्याकामी मुख्यध्यापक, शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. हे सर्व करताना जागेची निवड, माती जमवेण आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करताना थोड्याफार प्रमाणात अडचणी आल्या परसबाग निर्माण करताना आलेल्या अडचणींवर पुढील प्रमाणे प्रयत्न केला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोकणगांव शाळेला व विद्यार्थ्यांना परस बागेतून झालेले फायदे पाहुयात

१)परसबागेमध्ये कोणकोणत्या रोपांची लागवड केली पाहिजे ? कोण कोणत्या रोपांना किती कालावधी लागतो. ? या मुलांनी नोंदी घेतल्या निरीक्षण क्षमता, आकलन, अनुमान,तर्कशक्ती इ. प्रयोगवृत्तीचा अनुभव आला. २)विज्ञानामध्ये जो परिसर अभ्यास मुलांना शिकविला जातो त्याचा प्रत्यक्ष अनुभव मुलांनी परसबागेतुन घेतला. ३)परस बागेतील रोपे मुलांनी स्वत:हुन आपापली वाटून घेतली व पूर्णपणे संगोपनाची जबाबदारी स्वीकारली यामुळे मुलांना स्वावलंबन, परिसर संवर्धन, वृक्षप्रेम इ पर्यावरण पूरक मूल्यांचे संस्कारण करता आले. ४)मुलांनी परस बागेची व त्यामधील रोपांची मनापासुन काळजी घेतली आणि त्यातून जी बाग फुलली त्यामधुन आलेलं जे काही उत्पन्न असले इ. मेथीच्या जुड्या, कोथींबीर च्या जुड्या, पालेभाज्या मुलांनी स्वत: जुड्या तयार केल्या, फळभाज्या जमा करुन...कमवा आणि शिका या योजनेअंतर्गत त्यांनी फुल नाहीतर फुलाची पाकळी म्हणून स्वत: शाळेच्या मैदानात बाजार भरवला. या बाजारामध्ये ग्राहक म्हणून त्यांचे पालक, गावकरी त्याठिकाणी आले यातून मुलांना आनंद मिळाला तसेच व्यवहारज्ञानही प्राप्त झाले. ५) तसेच या परसबागेतील भाजीपाला उदा.कोथींबीर, कडीपत्ता, टमाटर शाळेतील शालेय पोषण आहार योजनेतील मध्यान्ह भोजनात देखील उपयोगी आणला जातो.आपण रोपलेला, वाढवलेला भाजीपालाच आपल्याला खायला मिळाल्याने मुले अधिकच आंनदी झाल्याची आढळले. ६) परसबागेतील फुलझाडांचीच फुले शाळेत एखादी जयंती, पुण्यतीथी, कार्यक्रम साजरा करताना वापरली जातात. ७) परसबागेमुळे मुलांचे शेतीविषयक ज्ञान वाढले. ८) शाळेविषयी विद्यार्थ्यांना अधिकच गोडी निर्माण झाली. ९) परसबागेमुळे सर्व विषय हाताळता आले.

परसबागेच्या या प्रयत्नांने श्रमाच्या वेलीला आली यशाची फुले या उक्तीचा प्रत्यय आला. व मुलांमध्ये श्रम संस्कार रुजवण्याचे मुल्यशिक्षण देण्याचा आनंद मिळाला.

# हिरवाईचा मेळा



**चंद्रकांत बाबाजी बेलोटे**
जि.प.प्राथ.शाळा पडस्थळ (पुन.)
ता.पंढरपूर जि.सोलापूर
९२०९१८९११६

''जेथे झाडे झुडे तेथे पाऊस पडे,
जेथे पाऊस पडे तेथे झाडे-झुडे''

या वाक्यानुसार पाऊस व झाडे यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे. सततचा दुष्काळ, पावसाचे अपुरे प्रमाणे वाढते तापमान, पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास यावर एकमेव रामबाण उपाय म्हणजे वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन झाडे लावणे हे एक वेळ सोपे काम पण त्यांचे संवर्धन व जोपासना करणे हे एक आव्हानात्मक काम होय. पण हे आव्हान पेललय ते जि.प.प्राथमिक शाळा पडस्थळ (पु.न.) येथील शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांनी. या यशस्वी उपक्रमाचा आढावा आपल्या समोर मांडण्याचा एक छोटासा प्रयत्न.

आपल्या शाळेत भरपूर झाडे असावीत. झाडांचे पर्यावरणाच्या दृष्टिने असलेले महत्त्व व विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये वृक्ष लागवड व संवर्धनाचे महत्त्व रुजविण्यासाठी जि.प.प्राथमिक शाळा पडस्थळ (पनु) येथील मुख्याध्यापक चंद्रकांत बाबाजी बेलोटे व माजी मुख्याध्यापक गणपत शेषराव नाईक यांनी १ जुलै २०१८ रोजी शाळेत १२० झाले लावण्याचा व ती जोपासण्याचा संकल्प केला व तो आज सिध्दीस नेला सध्या शाळेत कार्यरत असलेले चंद्रकांत बेलोटे व उपशिक्षक श्री.शेखर रसाळ अगदी लहान मुलांप्रमाणे या झाडांची निगा राखतात, त्यांच्यासोबत विद्यार्थी व ग्रामस्थ हे देखील हातभार लावत आहेत.

झाडे लावण्यासाठीचे काही खडडे् जे.सी.बी. च्या माध्यमातून घेतले, तर काही खडडे् स्वत: शिक्षक व विद्यार्थी यांनी घेतले.

ग्रामपंचायत सांगवी बादलकोट यांच्या माध्यमातून व सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्या सहकार्यतून रोपे उपलब्ध झाली. तसेच शिक्षक व पालक यांच्या लोकसहभागातून ४,०००/- रु.ची रोपे विकत आणली. झाडांची लागवड करण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ यांनी श्रमदानाच्या स्वरुपात सहकार्य केले. झाडांना आधार देण्यासाठी लागणाऱ्या काड्यांची उपलब्धता स्थानिक परिसरातून केली जाते.

झाडे लावल्यानंतर सुरुवातीला पाण्याची शाश्वत सोय उपलब्ध नव्हती.शाळेतील हातपंप व इतर ठिकाणातून बादलीने पाणी आणून शिक्षक व विद्यार्थींनी २ महिने रोपांना पाणी घातले. त्यानंतर १५ ऑगस्ट २०१८ रोजी पालकांना आवाहन करण्यात आले. त्या माध्यमातून १०,०००/- रु लोकसहभाग जमा करण्यात आला. गावठाण परिसरात असलेल्या बोअरवेल पासून शाळेच्या इमारतीपर्यंत पाईपलाईन करण्यात आली.१,००० लीटर क्षमता असलेली पाण्याची टाकी, पाणी साठवण्याकरीता घेण्यात आली १२०० फुट ड्रिप लाईनीच पाईप व ड्रिपरच्या साहाय्याने ठिबक सिंचनाचा वापर करुन प्रत्येक झाडापर्यंत पाण्याची मुबलक सोय करण्यात आली. व ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाणी बचतीचा सामाजिक संदेश देण्यात आला.

झाडांना ड्रिपच्या माध्यमातून मुबलक पाणी पुरवठा केला जातो.आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी अनावश्यक फांद्यांची छाटणी करणे इ. कामे शिक्षक व विद्यार्थी स्वत: करतात. लोकसहभागाच्या माध्यमातून झाडांना सेंद्रिय व रासायनिक खतांचा पुरवठा केला जातो. मैदानावर वाढलेल्या गवतावर रसायनाची फवारणी करुन त्याचा नायनाट केला जातो. या कामी पालकांचे सहकार्य लाभते. शाळेला दोन गेट असून शालेय वेळेव्यतिरिक्त इतर वेळेस दोन्ही गेट बंद असतात. झाडांभोवतीची माती भुसभुशीत करणे. तसेच पाण्याचे बाष्पीभवन टाळण्यासाठी झाडांच्या तळाशी पालापाचोळा टाकला जातो. प्रत्येक झाडे १० ते १२ फुट उंचीची असून काही झाडे १५ ते २० फुटापर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते.

झाडे लावल्यानंतर सुरुवातीला पाण्याची शाश्वत सोय

उपलब्ध नव्हती.शाळेतील हातपंप व इतर ठिकाणातून बादलीने पाणी आणून शिक्षक व विद्यार्थींनी २ महिने रोपांना पाणी घातले. त्यानंतर १५ ऑगस्ट २०१८ रोजी पालकांना आवाहन करण्यात आले. त्या माध्यमातून १०,०००/- रु लोकसहभाग जमा करण्यात आला. गावठाण परिसरात असलेल्या बोअरवेल पासून शाळेच्या इमारतीपर्यंत पाईपलाईन करण्यात आली.१,००० लीटर क्षमता असलेली पाण्याची टाकी, पाणी साठवण्याकरीता घेण्यात आली १२०० फुट ड्रिप लाईनीच पाईप व ड्रिपरच्या साहाय्याने ठिबक सिंचनाचा वापर करुन प्रत्येक झाडापर्यंत पाण्याची मुबलक सोय करण्यात आली. व ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाणी बचतीचा सामाजिक संदेश देण्यात आला.

झाडांना ड्रिपच्या माध्यमातून मुबलक पाणी पुरवठा केला जातो.आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी अनावश्यक फांद्यांची छाटणी करणे इ. कामे शिक्षक व विद्यार्थी स्वत: करताता. लोकसहभागाच्या माध्यमातून झाडांना सेंद्रिय व रासायनिक खतांचा पुरवठा केला जातो. मैदानावर वाढलेल्या गवतावर रसायनाची फवारणी करुन त्याचा नायनाट केला जातो. या कामी पालकांचे सहकार्य लाभते. शाळेला दोन गेट असून शालेय वेळेव्यतिरिक्त इतर वेळेस दोन्ही गेट बंद असतात. झाडांभोवतीची माती भुसभुशीत करणे. तसेच पाण्याचे बाष्पीभवन टाळण्यासाठी झाडांच्या तळाशी पालापाचोळा टाकला जातो. प्रत्येक झाडे १० ते १२ फुट उंचीची असून काही झाडे १५ ते २० फुटापर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते.

**लावण्यात आलेली झाडे पुढील प्रमाणे आहेत :-**

१.अशोक ट्री २.चिच ३. करंज४. जरोल ५. शेवगा ६.आवळा७.टिकोमा८.गुलामोहर९.काशीद१०.कडुनिंब ११.सप्तपर्णी १२.रॉयल पाम ट्री १३.पिंपळ १४.पाम ट्री १५.वड १६. अमेरिकन चेरी १७.रातरणी १८.कडिपत्ता १९.लिंबोणी २०.फुलझाडे वे शोची झाडे २१.डिडोनिया २२.सदाफुली २३.इंग्लिश शेर इ.

**परसबाग :-** परसबागेमध्ये शेवगा, कडिपत्ता,कोथिंबीर, मेथी,पालक,गवार, जवस, मोहरी, वांगी, टोमॅटो, भेंडी,चवळी इ, वापर शाळेत मुलांना दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनामध्ये नियमितपणे केला जातो, जि.प.प्राथमिक शाळा पडस्थळ येथे माझी शाळा हरीत शाळा उपक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या नाविण्यापूर्ण उपक्रमातील रक्षाबंधन हा एक उपक्रम. दि.१५/०८/२०१९ रोजी. केवळ विद्यार्थ्यांनाच राख्या बांधून संपन्न केला नाही. तर शाळेच्या परिसरामधील सर्व वृक्षांना राखी बांधून हा कार्यक्रम संपन्न केला. या अनुषंगाने संस्कृतीतील, रक्षाबंधन हा केवळ परंपरेने चालत आलेला सण साजरा करणे, हा उपदेश न ठेवता विद्यार्थ्यांनी वृक्षांना राखी बांधत असताना वृक्षांच्या रालीच्या, बाह्यअंगाच्या, स्पर्शाची जाणीव होण, त्यांच्या विषयी स्नेह निर्माण होय. हा फार मोठा उद्देश ठेवून आज शाळेतील सर्व वृक्षांना राखी बांधण्यात आली.

**१) सावली देणारी झाडे-** लावलेली प्रत्येक झाडे प्रामुख्याने सावली देतात. शाळेत लावण्यात आलेल्या झाडांमध्ये चिंच, करंज, गुलमोहर, काशीद, कडूलिंब, वड, अमेरिकन चेरी ही झाडे जास्त प्रमाणात सावली देणारी आहेत.

**२) औषधी उपयोग-** शाळेत लावण्या आलेल्या झाडांमध्ये आवळा, चिंच, शेवगा,कडूलिंब, डिपत्ता, लिंबोणी,करंज,तुळस,कोरफड या औषधी वनस्पती आहेत.

**३) फुलझाडे व शोसाठी झाडे-** फुलझाडांमध्ये गुलमोहर, टिकोमा, सदाफुली, रातराणी इ. उपलब्ध आहेत, तर अशोक पाम ट्री.सप्तपर्णी,इंग्लिश शेर,शाळेत प्रवेश करताच दुतर्फा असणाऱ्या डिडोनियांची रांग व इमारतीभोवती असलेली डिडोनिया शाळेच्या सौंदर्यात आधिक भर घालत आहेत.

**४) आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत (झाडे)-** चिंच, आवळा,शेवगा,लिंबोणी,करंज च्या माध्यमातून पुढील काळात शाळेसाठी आर्थीक रुपात निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या पैशांच्या माध्यमातून शाळेचा विकास व भरभराट होईल, अशी अपेक्षा आहे.

आजच्या दुष्काळी दिवसात ही सर्व झाडे हिरवीगार आहेत व आनंदाने डोलत आहेत. भविष्यात बगीचा, फुलझाडे व परसबाग अधिक विस्तृत स्वरुपाचा करण्याचा मनोदय या शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांनी व्यक्त केला आहे.

# आनंददायी प्रवासातील ज्ञानाची झरे



**युवराज माने**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी
ता. सेलू जि. परभणी
७५१७४७८५७

शाळेची पायरी उतरताना, मुलं जीवनाची एक पायरी चढली का? याचाच विचार खरा शिक्षक करत असतो.

दवडीपारमधील विद्यार्थ्यांच्या आठवणी सोबत घेऊन पलखेडा शाळेतील चिमुकल्यांसोबत नवी स्वप्न आणि नव्या दिशा धुंडाळताना आपल्या आयुष्यात आलेलं प्रत्येक मुल जीवनाच्या योग्य दिशेने प्रवाहित होत आहे की नाही याचाच विचार मनात यायचा. पलखेडा येथील आदिवासी–गोंडी बांधवांच्या सणावारामध्ये सहभागी होताना आनंद होत होता तो काही वेगळाच. यातून नात्यांची उत्तम अशी वीण गुंफत जात होती.

**कुठलाही नियमात सातत्य आणि ध्यास असला की त्याला समाधानाची फुले येतात....** आणि असं समाधान या नव्या ठिकाणीही मला लाभत होतं. आनंदाच्या झाडाचा हा प्रवास करत असताना वेगवेगळ्या थरातील किंबहुना आपल्या परिसरातील वेगवेगळी घटक सदैव प्रेरणेची झरे ठरली... दवडीपार येथे काम करत असताना मुलांच्या भावविश्वाला अनुसरून वेगवेगळ्या कलात्मक कृती घेण्यात आमचे दिवस कधी जायचे कळत नव्हतं .अशातच ‘या जगण्यावर या जन्मावर ’ संध्या पवार यांचे पुस्तक वाचनात आलं आणि त्यांना त्या पुस्तकात आवडलेला भाग व हे पुस्तक का आवडलं ? या पुस्तकातून आम्ही काय घेतलं ?याविषयीचे सविस्तर पत्र माझ्या लेकरांनी पाठवलं. लेकरांच्या पत्राला सुंदर असं प्रत्युत्तर प्राप्त तर झालंच याशिवाय मला तुम्हाला भेटण्याची खूप इच्छा आहे अशा पद्धतीचा संदेशही प्राप्त झाला. डॉक्टर संध्या पवार या नागपूर जिल्ह्यात प्राथमिक शिक्षक म्हणून काम करतात. शिक्षणासोबतच समाजाचे आपण काहीतरी देणं लागतो हा विचार डोक्यात घेऊन डॉक्टर संध्या पवार यांनी तंबाखू मुक्त अभियान सुरुवात केलं होतं. शाळेनंतर मिळणारा वेळ समाजातील या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी त्या प्रबोधन करत होत्या .! वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन तंबाखू मुक्ती अभियान त्या चालवायच्या. याशिवाय ज्या मुलींना शिक्षणात अडचणी आहेत किंवा ज्यांना कोणीही सांभाळत नाही अशा मुलींना त्या आपल्या घरी सांभाळत त्यांचे शिक्षण पूर्ण करत आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभा करून त्यांच्या संसाराची घडी सुद्धा बसवत .जवळपास पंधरा ते सोळा मुलींचा त्यांनी सांभाळ करून त्यांचं कन्यादानही केलं. शिक्षण क्षेत्रात ज्ञानदानाचे काम करत असताना समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो ,समाजाप्रती उतराई व्हावं या विचारातून डॉक्टर संध्या पवार यांचं अविरत असं कार्य चालूच आहे. मुलांच्या हाकेला ओ देऊन डॉक्टर संध्याताई पवार माझ्या शाळेत दाखल झाल्या.

**पुस्तकातली थोर माणसं प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला मिळाल्याचा आनंद लेकरांच्या चेहऱ्यावर दिसत होता.** डॉक्टर संध्या पवार यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी व गावातील पालकांशी उत्तम संवाद साधला. आपण पाठवलेल्या चार शब्दरूपी पत्राद्वारे एखादी व्यक्ती आपल्यापर्यंत भेटायला येते ही गोष्ट मुलांना खूप मोठी प्रेरणा देऊन गेली. डॉक्टर संध्या पवार यांनी शाळेतील माझ्या मुलांना व मला एक वेगळ्या नात्यांमध्ये गुंफून सातत्याने मार्गदर्शनाच्या भूमिकेत राहिल्या. अनेक ठिकाणी मदतीचा हात दिला.

‘किशोर’मासिकातील ‘विश्वासाचा परिसस्पर्श’ नावाची कथा वाचली .मुलांना ती खूप आवडली. कथेच्या सारांश मध्ये प्रविण दवणे यांनी अमूल्य असा संदेश दिला होता, ज्यांनी तुम्हाला प्रेम दिल, ज्ञान दिलं , त्यांच्याविषयी सदैव कृतज्ञता व्यक्त करावी. मुलांना आवडलेली ही कथा व सारांश मधला अमूल्य संदेश यावर चर्चा करून प्रविण दवणे यांना मुलांनी पहिलं पत्र लिहिलं तर आश्चर्य प्रवीण दवणे सरांनी तितक्याच तातडीने स्वतःच्या हस्ताक्षरात पत्र

लिहून पाठवलं. मुलांना आलेले हे पत्र त्यांच्या ओंजळीत त्यांच्या आवडीच्या खाऊ प्रमाने होतं. एका शब्दरूपी पत्राद्वारे प्रवीण दवणे सरांसोबत जोडलेला स्नेह आजतागायत कायम आहे. लेकरांच्या मनोभूमीकेमध्ये योग्य दिशा देण्यासाठी प्रवासातील ही ज्ञानाची सदावर्ते मला सतत उपयुक्त ठरत गेली .प्रवीण दवणे सरांचं जेही पुस्तक आवडेल ते मुलांना वाचून दाखवायचं हा सपाटाच सुरू केला. मी सरांच्या या पुस्तकाच्या माध्यमातून माझ्या लेकरांची मन व कान समृद्ध झाली. एखादा लेखक मुलांच्या मनात किती सहज प्रवेश करतो व कायमची जागा घेऊन बसतो .प्रवीण दवणे सरांच्या प्रत्येक कवितेला कथेला माझ्या चिमुकल्यानि आजपर्यंत दादच दिली आहे.

**एकदा आत्मविश्वास जागला की चिमणीला ही पंख फुटतात आणि ती आकाशात गरुड झेप घ्यावयास सिद्ध होते.**

जीवनातून शिक्षण मिळावं आणि शिक्षणातून जीवन कळावं हा प्रवास असा दुतर्फा असावा. चाललेला हा आमचा प्रवास 'चांदण्यात भिजायचे राहून जाऊ नये ' या पुस्तकापर्यंत येऊन ठेपला.डॉक्टर आ ह साळुंखे या परीसाचा माझ्या चिमुकल्यांना स्पर्श झाला.'त्यांना सावलीत वाढवू नका' हे पुस्तक मुलांना वाचून दाखवलं आणि मुलांनी आ ह साळुंके सरांना कृतज्ञतापर पत्र लिहिलं या पत्राचे उत्तरही लेकरांची खरी कमाई होती. पत्रामध्ये आ ह साळुंखे सरांनी एक अमूल्य असा संदेश चिमुकल्यांना दिला.

**बाळांनो, तुम्ही उद्याची फार मोठी माणसं आहात . एक गोष्ट सतत लक्षात असू द्या 'कृतज्ञता' हा फार मोठा संस्कार आहे आणि तो तुमच्या शाळेमध्ये तुमच्यात उतरवला जात आहे ही फार मोठी गोष्ट आहे.** डॉक्टर साळुंखे हे सातत्याने आमच्या आनंदाच्या झाडातील प्रत्येक झाडाविषयी आतुरतेने चर्चा करतात. **खरंच विचारांची श्रीमंती हवी असेल तर वाचन हा एकमेव पर्याय आहे.** आ ह सरांच्या जवळपास छोट्या-छोट्या सर्वच पुस्तकांचं पारायण मी 'वाचनाचा आनंदसोहळ्यामध्ये'मुलांसाठी केलेला आहे हा ज्ञानाचा कुंभ माझ्या शाळेतील प्रत्येक चिमुकल्याशी जोडला.याचा आनंद आजही कायम आहे. अधून-मधून शिक्षणातील किंबहुना समाजातील वेगवेगळ्या समस्यावर आजही मला अवगत करून देतात.समाजातील नेमक्या प्रश्नांवर बोट मांडून तुम्ही जिल्हापरिषदेचे किंबहुना बहुजनांच्या मुलांसाठी काम करणारे शिक्षक आहेत म्हूणून तुमची जिमेंदारी अधिक आहे.हे कटाक्षाने आठवण करून देतात. एका मार्गदर्शकाची भूमिका डॉक्टर साळुंखे सरांनी सदैव घेतली आहे ज्ञानाच्या सदावर्तमध्ये सदैव सर्वोच्च स्थानी असलेली डॉक्टर आ ह साळुंखे सर माझ्या चिमुकल्यांना एक नवीन दृष्टी दाता ठरले आहेत.

'पेराल ते उक्षवेल,

शेतकरी पारखून पारखून बीज पेरतो ते 'सुक्षेत्री' पडायला हवं म्हणून शेतीची किती मशागत करतो? एवढे कार्य योग्य झालं तरच हाती चांगली भरघोस सुगी लागते.विद्यार्थ्यांचे मन असंच क्षेत्र असते .शिक्षक त्यांचं आपल्या संस्काराने 'सुक्षेत्र' करतो ज्ञान हे मूल्यात मिसळून त्यात पेरतो. अभ्यासक्रमाचा पाठ वाहता ठेवतो असं घडलं तरच आणि तरच डॉक्टर नारळीकर, मारुती चित्तमपल्ली ,डॉक्टर रघुनाथ माशेलकर असे देखणे वांन निपजतात.....

**उपक्रम हा आपल्या धडपडीचा आरसा असतो**

हे उपक्रम म्हणजेच विद्यार्थ्यांच्या मनोभूमिकेत उत्तम बीजांची रुजवण करणं होय. प्रकाश बोकील सुप्रसिद्ध लेखक यांनी वर्ग पाचवीतील माझ्या विद्यार्थ्यांना नवोदय परीक्षेतील अपयशानंतर मोलाचा संदेश दिला .मोडून पडलेली माझे विद्यार्थी पुन्हा मोठ्या उभारीने उभी राहिली .सातत्याने अनेक वर्षे माझ्यालेकरंसोबत संवाद साधत राहिली. प्रकाश बोकील यांची सर्व पुस्तक आमच्या लेकरांनी वाचून काढली. आनंदाच्या या प्रवासामध्ये अशा पद्धतीची अनेक विज्ञानयात्री मला सदैव प्रेरित करत गेली किंबहुना माझ्या लेकरांच्या पंखात बळ भरत गेले... त्यांच्या डोक्यात असलेल्या वेगवेगळ्या कल्पना पत्राद्वारे आम्हाला कळवल्या .त्याचा उपयोग आदिवासी नक्षलग्रस्त भागातील या लेकरांना शाळेत रमून ठेवण्यासाठी व पुढे भविष्यात मनश्रीमंत करण्यास उपयुक्त ठरले.

साचेंबद्ध आयुष्य तर अनेक जण जगत असतात पण एखादा माणूस त्याच्या समर्पित जीवनातून इतरांचं आयुष्य उभा करतो. आपले अनुभव ,आपल्या व्यक्ती ,घटना आणि माहिती यांच्यावर विचार करून कृती करणे ही माणसाला

लाभलेली फार महत्त्वाची क्षमता आहे .अशातच मी व माझ्या सोबत पन्नास सहकारी शिक्षकांची सहल नवेगाव बांध येथील निसर्ग लेखक डॉक्टर मारुती चितमपल्ली यांच्या मुलाखतीसाठी गेलो. लेखक म्हणून त्यांची ओळख असली तरी आपल्या भारत देशातील महान असा ज्ञानाचा स्त्रोत नवेगाव बांध याठिकाणी स्थित होता. निसर्गाप्रती ओढ, प्रेम व जिज्ञासा ठासुन भरलेला हा व्यक्ती आपल्या सर्वांना निसर्गाचं उत्तम अस ज्ञानअमृत तयार करण्याचे काम या आदिवासी नक्षलग्रस्त जंगलामध्ये करत होता .आमच्या माननीय केंद्रप्रमुख आगडे यांनी काढलेली ही निसर्ग सहल मारुती चितमपल्ली यांच्या अंगणात येऊन पोहोचली आणि मारुती चितमपल्ली यांचा जीवनपट सहजरित्या उलगडता आला .त्यांची मुलाखत घेण्याचा योग हा माझ्या आयुष्यातील सुवर्णक्षण होता. मारुती चितमपल्ली यांचं 'चकवा-चांदणं' हे आत्मचरित्र वाचलं तेव्हापासूनच मनात त्यांच्या प्रती भेटण्याची ओढ लागली होती. शब्दांचे धन किंवा त्यांची इतरही पुस्तक माझ्या शाळेतील या लहान किंबहुना महान वाचकाला भावून गेले. चितमपल्ली यांची सर्वच पुस्तक माझ्या संग्रहात असल्याचा मला सार्थ अभिमान आहे .आमच्या ज्ञानाच्या प्रेरणास्रोतात मारुती चितमपल्ली ही सदैव अग्रणी आहेत.

**आपल्या श्रमाचा ,प्रयोगाचा आनंद हा आपला आनंद आहे.** मुलांना केवळ पुस्तकात न रमवता त्याच्या पलीकडेही एक प्रत्यक्ष जग असतं हे दाखवून देण्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांची सुरुवात करता आली पाहिजे .पलखेडा शाळेला लागूनच घुमरा हे छोटं धरण होत .ते सदैव आम्हाला साद घालायचं. अधून-मधून या घुमरा धरण परिसरात आम्ही छोटेखानी सहली घेऊन जायचं त्यांमधील अथांग पाणी पाहून लेकरांच्या मनात सुद्धा विशालत्वाची ही भावना रुजवण्याल्या जाऊ लागली होती .घुमरा ड्याम हासुद्धा एक आमच्या ज्ञानाच्या या प्रवासातील उत्तम असा प्रेरणास्त्रोत ठरला.या धरणावर परिसरात वेगवेगळ्या प्रकारची पक्षी, प्राणी व यांवर उपजीविका साधणारे वेगवेगळी काम करणारे माणसं हा एक भोगोलिक वारसा लेकरांना देताना .त्याचा फार उपयोग झाला त्यांच्या आतमध्ये जाऊन पाण्याचा व व बोटीद्वारे प्रवास करण्याचा आनंद मी व माझ्या सहकारी व लेकरांनी उत्तमरित्या घेतला आहे.

आज कुठल्याही क्षेत्रात उत्तुंग यश मिळवलेल्या ज्या व्यक्ती आहेत त्या साऱ्यांनी बालपणी, तारुण्यात आपलं आयुष्य अक्षरशा उकळत ठेवलं होतं .मीसुद्धा एक जिल्हा परिषद शिक्षकाचा मुलगा आहे आणि मला शिक्षणाप्रती फार तळमळ आहे ,आवड आहे .बाळांनो, तुम्हीसुद्धा उद्याची फार मोठी माणसं आहात. पालकांनो अतिशय दुर्गम भागात तुम्ही शिक्षणाचीही उत्तम अशी गुढी उभारली आहे याचा मला या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी म्हणून अभिमान आहे .आजपासून पलखेडा हे गाव माझंच आहे आणि तुम्ही सर्वजण माझे आहात आपणास माझा सदैव सहकार्य असेल अशी ठणकावून सांगणारे माननीय डॉक्टर विजय सूर्यवंशी हा भला माणूस ज्ञानाच्या आनंद सोहळ्यामध्ये एक नवा प्रवासी म्हणून लाभला. प्रेरणा चा उत्तम असाच झरा आम्हा सर्वांना मिळाला. नक्षलग्रस्त भागातील एक जंगलातील शाळा जगातील ज्ञान इंटरनेटच्या माध्यमातून मिळवण्यासाठी धडपडतोय ही त्यांना फार कुतूहलाचा वाटलं आणि त्यांनी प्रत्यक्ष माझ्या पलखेडावासियांना येऊन संवाद साधला एखादा जिल्हाधिकारी जेव्हा प्रत्यक्ष एका खेडेगावातील मुलांना पालकांना भेटायला येतो आणि खूप काही देऊन जातो ही आयुष्यातील एक अविस्मरणीय देणगी ठरली.

**गुणग्राहकता व्यक्तिमत्त्वाचा आवश्यक पैलू तो अनेक घटना मधून नकळत जोपासला जातो. हा पैलू असणारी माणसं जीवनात यशस्वी ठरतात .या पैलू अभावी ही माणसं खडूस म्हणून ओळखली जातात. समाज जात अप्रिय असतात.** म्हणून मला माझी मुलं गुणग्राहक स्वभावाची बनवायची होती त्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांची रुजवात मी करत होतोशाळेच्या बाहेरही इतर शिक्षकांनाही प्रेरणादायी काम करता यावे यासाठी सहयोग शिक्षक मंचाची स्थापना करण्यात आली. सहयोग शिक्षक मंचच्या माध्यमातून सामाजिक व शैक्षणिक कामाचा एक नवा आयाम उभा करता आला. आणि या सहयोग शिक्षक मंचमध्ये डॉक्टर विजय सूर्यवंशी हे प्रभावी व्यक्तिमत्व स्वतःहून संमेलित झालं .जिल्ह्यातील शिक्षणात एक वेगळ्या पद्धतीचा नवा मेरू उभा करण्याचे काम डॉक्टर

विजय सूर्यवंशी यांनी सहयोग शिक्षक मंचाच्या माध्यमातून केलं.. बेटी बचाओ अभियान असो जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठीचे प्रयत्न असून प्रत्येक शैक्षणिक उपक्रमासाठी स्वतःहून सहभाग दर्शवणारे डॉक्टर विजय सूर्यवंशी सर हे केवळ माझ्या पुरतीच नाही तर जिल्ह्यातील सर्व शिक्षकांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्व ठरलं. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे असे म्हणतात हे विधान असत्य होण्यासाठी शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या संपर्कातून समाजाभिमुख होणं गरजेच आहे हे सहयोग शिक्षक मंचाचे काम करत असताना आमच्या लक्षात आलं..

आनंदाच्या झाडाचा हा वेगवेगळ्या धाटणीच्या प्रवास अनेक प्रेरणादायी झऱ्यांचे ज्ञानरूपी पाणी प्राशन करत पुढे चालला होता .आमच्या या प्रवासामध्ये अशी अनेक ज्ञानाची कुंभ भेटली सर्वांचाच याठिकाणी वर्णन करणं अशक्यच आहे परंतु या माध्यमातून या लेकरांच्या मन बुद्धी आणि हस्तनेत्र कौशल्यांचा विकास नक्कीच झाला .याचं मला फार समाधान आहे.

**जगाच्या पाठीवर माझं नक्कीच एक सन्मानाचे स्थान असेल.** असा ठाम निर्धार बनविण्यासाठी व मुलांच्या पंखात बळ भरण्यासाठी अशी अनेक ज्ञानाची सदावर्ते आपल्या आजूबाजूला असतात .त्यातून हवं तेवढे ज्ञान ग्रहण करून ते लेकरां पर्यंत पोहोचतं करण्याचे काम माझ्या सहकारी बांधवांनी केले पाहिजे.कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील शिक्षण पद्धती किती गतिमान आहे यावर अवलंबून असते .यासाठी गतिमान विचार करणारे शिक्षक खूप महत्त्वाचे आहे सोबतच मुलांच्या मनात आपलं स्वतःचं स्थान निर्माण करणारा शिक्षक आज सर्व शाळांमध्ये आनंदाच्या झाडांना हवा आहे....

## शिक्षण वार्ता

# आता छायाचित्रावरून मिळेल पक्ष्यांची माहिती

पक्ष्यांची माहिती बऱ्याच जणांना नसते. काही मोजके पक्षी सोडल्यास इतर पक्ष्यांना ओळखणे कठीणच जाते. रंगबेरंगी पक्षी कसा ओळखावा याची अनेकांना कल्पना नसते. मार्गदर्शक पुस्तके,इंटरनेटचा वापर करुन पक्ष्यांची ओळख पटवली जाते. या अडचणीवर आता मात करण्यात आली आहे.बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी आणि अक्सेच्युअर लॅब यांनी 'इंटरनेट ऑफ बर्डस' या मोबाईल ॲपमुळे छायाचित्र अपलोड करताच पक्ष्यांची ओळख पटणे सोपे होणार आहे.

'इंटरनेट ऑफ बर्डस' या ॲपवर ६०० पक्ष्यांची ओळख पटणार आहे. इंटरनेट ऑफ बर्डस ही वेबसाईट २०१६ मध्ये विकसित करण्यात आली होती.त्यात केवळ १०० पक्षी ओळखता येत होते. मात्र इंटरनेट आवश्यक असल्याने जंगलात पक्षी निरीक्षणा ठिकाणी अडचण येत होती.

म्हणूनच या ॲपव्दारे देशातील १३०० पक्षी प्रजातीपैकी ६०० प्रजातींची माहिती मिळतास मदत होणार आहे. ॲपमध्ये छायाचित्र अपलोड करण्यासाठी नव्याने काढलेले व मोबाईलमध्ये साठवून ठेवलेले असे दोन पर्याय आहेत. छायाचित्र अपलोड होताच कृत्रीम बुध्दीमत्ता, मशिन लर्निंग आणि कॉम्प्युटर व्हीजन याचा वापर करुन पक्षी ओळख होते ॲपमध्ये साठवलेल्या माहितीनुसार पक्ष्यांचा प्रजातीची नेमकी ओळख होत नसेल तर टक्केवारीमध्ये शक्तता वर्तवली जाते.या ॲपमुळे पक्षीनिरीक्षक शालेय विद्यार्थी यांच्यात पक्ष्यांची गोडी वाढणार आहे.



# लोकशिक्षक संत गाडगेबाबा



**सारीका निशांत रंधे (सगरे)**
उ.विभागीय प्रदेशाध्यक्षा परीट
समाज शिरपूर जि.धुळे
९८५०२४७१२२

ऊदार तुम्ही संत। मायबाप कृपावंत ।।
अनंत केले ऊपकार। काय वाणू मी पामर।। - संत नरहरीदास

पुरोगामी महाराष्ट्र घडविण्यात संत परंपरेतील संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर,संत नामदेव, संत एकनाथ,संत जनाबाई, संत नामदेव, संत तुकडोजी, संत गाडगेबाबांनी लोककल्याणास्तव भव्य योगदान दिले आहे.संत गाडगेबाबांनी तर लोकशिक्षणाच्या माध्यमातुन जनजागृती केली. हाती खराटा ते गाव स्वच्छ करायचे आणि रात्री किर्तनाच्या माध्यमातुन लोकांच्या डोक्यातील घाण स्वच्छ करायचे. माणसात देव शोधणारा संत म्हणून आचार्य अत्रेनी त्यांना गौरवले आहे.ज्ञान, भक्ती, कर्म यांचा सुरेख संगम त्यांच्या ठायी झालेला दिसतो, त्यांनी अज्ञान अंधश्रध्दा, कर्मकांड,दैवत्वीकरण यांच्यावर शब्दप्रहार केले. संत तुकोबा, म.ज्योतीबा फूले यांच्या विचारांचा वारसा त्यांनी हाती घेतला व आयुष्यभर ज्ञानदानाच्या कार्यासाठी झटले.

'आम्हा घर धन शब्दांचीच रत्ने।। शब्दाचीच शस्त्रे यत्ने करु ।।''

'नाचु किर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावु जगी।।'

संत तुकोबारायांच्या या अभंगाचा अंगीकार प्रत्येकाने करावा. गाडगेबाबांनीदेखील याच ऊक्तीने बहुजनांना ज्ञानसंजीवन देऊन ऊद्धृत केले. मानवतेचे थोर ऊपासक कर्मयोगी बाबा स्वत: निरक्षर होत पण सर्वांना साक्षर होण्याचा संदेश ते देत राहिले. समतेवर, एकात्मता आधारित सामाजव्यवस्था देशात नांदावी यासाठी त्यांनी किर्तनाच्या माध्यमातुन लोकांना शिक्षण दिले.माणसाने माणसावर प्रेम केले पाहीजे व माणुसकीने वागले पाहिजे हाच खरा धर्म त्यांनी वर्तवला डॉ.बाबासाहेबांबद्दल त्यांना आदर होता. शिक्षणाने माणसाला मोठेपण लाभते,आपले जीवनमानसुधारते असे बाबा नेहमीच सांगत.

'असुन निरक्षर केले साक्षर ।।
लेवूनी चिंध्या दिले वस्त्र असंख्य जन।।
खावुन शिळेअन्न दिलेल पक्वान्न असंख्य जन।।
करुनी किर्तन झाले मार्गदर्शन असंख्य जन ।।
झाडुन देश दिला संदेश असंख्य जन ।।

परखडपणे आपले विचार मांडणारे वैराग्यमुर्ती गाडगेबाबा सामान्यातील होते. तत्कालीन विषण्ण करणाऱ्या परिस्थितीची चिंता न करता चिंतन करुन त्यांनी प्रबोधनाचा ध्यास मनी धरला.मनुष्यातील विवेक संपून तो पशुतुल्य होत आहे याचाही लोकाभ्यास बाबांनी केला व कित्येक वर्षे पायीपायी फिरुन लोकांचे हृद्यपरिवर्तन करुन आणले, संघर्षातुन वाट काढत काढत बाबांनी कर्मवीर भाऊराव पाटील,म.गांधीजी समवेत शिक्षणविषयक ध्येय धोरणांची देवाण घेवाण केली.देवाची मंदिरे उभारण्यापेक्षा शिक्षणाचे मंदिर अर्थात शाळा ऊभारण्याचे कार्य करणाऱ्यांना साथ देण्याचे त्यांनी आवाहन केले. असे गाडगेबाबा सर्वांसाठी प्रेरक आहेत त्यांची अंर्तनिष्ठा पाहुन बाबा आमटेंच्या काव्यपंक्ती आठवतात.

शृंखला पायी असू दे मी गतीचे गीत गायी
दु:ख ऊधाळायास आता आसवांना वेळ नाही
पांगळ्याच्या सोबतीला येऊ द्या बलदंड बाहु
निर्मितीच्या मुक्तगंगा द्या ईथे मातीत वाहु

अंधश्रध्देमुळे दुर्गंधी पसरते व त्यांत सामान्यजनांचाच बळी जात आहे ही जाणीव बाबांनी किर्तनाद्वारे करुन दिली. सत्यनारायणाची कथा काय सांगते? बुडालेली नौकास वर येते मग सैन्यांचे जहाज बुडाले तर सरकार समुद्रकाठी सत्यनारायण का घालत नाही? असा परखड सवाल ते करत. शिक्षणाचा सुगंध मिळाला तर आपले शरीर चांगल राहुन आपण कुटुबियांच्या व देशाच्या प्रगतीला हातभार लावू शकतो. शिक्षणविना मनुष्य पांगळा

होतो.असे त्यांचे शिक्षणविषयक विचार होते. बाप्पाहो तुमची गरीबी असेल तर संसारात काटकसर करा पण मुलाबाळांना शिकवा रे !! असे सर्वांना सांगत. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. असे त्यांनी सांगितले. शिक्षणाची महिमा ते लोकांना पटवुन देऊ लागले. विद्यार्जन हा गुरुमंत्र  त्यांनी दिला.गाडगेबाबांनी हाती खराटा घेतला आणि मरीआईने गावातुन पळ काढला .गाडगेबाबा डॉक्टर होई खराट्याचं ईंजेक्शन हाती घेई घाणीमंधी रोगराई आत दडूनी बसली मरीआई

गाव झाडुनी स्वच्छ केला
गाडगेबाबांनी मंत्र दिला.
डेबीजीने ठोकली आरोळी
कोंबड बकरं नको देवाला
दुबळ्या मनी भोपे फसवती
जादुटोणा भानामती
मुठ मारुन माणसे मारती
सैन्यात करा त्यांची भरती
सद्‌गुरुची ऐका वाणी
अंधश्रद्धेवर विश्वास ठेवी नका कोणी ।।
गाडगेबाबांची उपदेशवाणी
मुठमाती भोंदुगिरीला!!

अशा प्रकारे ग्रामस्वच्छतेचे जनक गाडगेबाबा वैराग्यमुर्ती ठरले. लोकजागृतीचे सेवाव्रत घेऊन तिमिरातुनी तेजाकडे नेणारी दिशा समजाला देणारे नेतृत्व खऱ्या अर्थाने वंदनीय आहे. त्यांना जातीच्या व दैवत्वाच्या पारड्यात तोलने चुकीचे आहे.गाडगेबाबा ज्यांना समजले त्यांनी यश प्राप्त केले आहे.

'दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती'
गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला गाडगेबाबा गोपाला !

## शिक्षण वार्ता

## शिक्षकांच्या गुणवत्तेसाठी व्यवसायीकदृष्ट्या प्रशिक्षण मिळणार.

देशभरातील शिक्षकांना समान मार्गदर्शन मिळावे त्यांची गुणवत्ता सुधारावी यासाठी लवकरच नॅशनल प्रोफेशन स्टॅन्डर्डस फॉर टिचर्स (छझझढ) ची निर्मीती करण्याचा मानस केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने व्यक्त केला आहे. या मार्फत देशभरातील शिक्षकांना योग्य प्रशिक्षण देखील दिले जाणार असुन सर्व शाळातील शिक्षकांची नियुक्ती नियमबध्द प्रक्रियेमार्फत करण्याचा विचार आहे. केंद्राच्या धर्तीवर राज्य पातळीवर एसपीएसटी (स्टेट प्रोफेशन स्टॅन्डर्डस फॉर टिचर्स) ची निर्मिती करण्यात येणार असून या दोन्ही संस्थेमार्फत शिक्षकांचे मुल्यमापन होणार असून त्यानुसार शिक्षकांच्या पदोन्नती आणि वेतनवाढ करण्याचा विचार केला जाणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणातील मसुद्यात ही शिफारस करण्यात आली असून दर दहा वर्षानंतर गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेचे विश्लेषण करण्यात येईल प्रत्येक स्तरावर शिक्षकांचे कामाचे पदोन्नती ही ठरवण्यात येणार आहे.

## शाळा तपासणी होणार वर्षभरात तीनदा !

शाळांचे प्रशासन आणि व्यवस्थापन सुधारणा हेतून वर्षातून तीन वेळा शाळा तपासणी करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी दिले आहेत. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने देशातील सर्व राज्यातील शिक्षण विषयक स्थितीचे मुल्यांकन करण्यासाठी कार्यक्षमता प्रतवारी दर्शक तयार केले आहेत. त्यात ७० निकष आहे. एखाद्या राज्यातील शिक्षण शाळा यांचे पीजीआय ठरवण्यासाठी युडायस पोर्टस, शगुन पोर्टल, एमडी एम पोर्टल आदिमध्ये शाळांनी सादर केलेली माहिती तपासली जात आहे. केंद्र शासनाने २०१७-१८ या वर्षातील माहितीच्या आधारावर राज्यांची क्रमवारी निश्चित केली आहे.त्यात शाळांमध्ये शालेय प्रशासन व्यवस्थापन श्रेणी सुधारण्यासाठी शासनाने मार्गदर्शक सुचना जारी केल्या असुन शिक्षणाधिकारी आणि त्यांच्या अधिजस्थ यंत्रनेने वर्षातून तीन वेळा शाळा तपासणी करावयाची आहे.

# गोवा पोर्तुगीजांच्या दास्यातून मुक्त



**संदेश नंदकिशोर हजारे**
शिरपूर जि.धुळे
९८५०९६४६०१




स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही १४ वर्षे पोर्तूगीजांच्या अमलाखाली राहिलेला भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील गोवा, दीव व दमणचा भाग भारत सरकारने केलेल्या सैन्य कारवाईनंतर म्हणजे १९ डिसेबर, १९६१ रोजी मुक्त झाला. सुमारे ४५० वर्षे केवळ बंदुकीच्या जोरावर साम्राज्यवादी पोर्तुगीजाची जुलमी सत्ता गोव्यावर अधिराज्य गाजवून होती. पण गोवा आणि महाराष्ट्रातील आंदोलकांच्या तीन दशकांच्या अविरत चळवळीनंतर व शेकडोच्या बलिदानानंतर गोवामुक्ती प्रत्यक्षात आली. त्यामुळे. हा विजय केवळ भारतीय फौजेचा नव्हता, तर अवघ्या गोमंतकीय जनतेचा होता.

पूर्वी पूर्वेकडील जगतात व्यापार करण्याकरिता गोवा म्हणजे दिंडी दरवाजा मानला जायचा. त्यामुळे, पोर्तूगालचा दर्यावर्दी वास्को-द-गामा (इ.स.१४९८) याच्यानंतर जेव्हा अल्बुकर्क इ.स. १५१० मध्ये भारतात आला, तेव्हा गोव्यात शिरकाव करण्याच्या हेतूनेच तो हे इथे पोहोचला होतो. गोवा तेव्हा मुस्लीम राज्यकर्तांच्या आधिपत्याखाली होते. काही कुमक घेऊन तयारीनिशीच आलेल्या अल्बुकर्कने विजयनगरचा सरदार तिमय्या याच्याशी संगनमत करुन गोव्यावर चढाया केल्या आणि दीव व दमणच्या भागात आपलं आसन बळकट केलं आणि त्यानंतर सुमारे चार शतकं त्यांचे येथील आधिपत्य अबाधित राहिलं. इ.स.१७५७ पासून इंग्रजांनी अनेक वेळा चढाया करुन पोर्तुगीजांकडून गोवा हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले. गोव्यातील जनतेवर जरब ठेवून त्यांनी आपली साम्राज्यवादी सत्ता अबाधित ठेवली.

इ.स. १९४७ मध्ये ब्रिटिश आधिपत्याखालील भारताला स्वातंत्र्य मिळालं, तरी गोवा पोर्तुगीजांकडून मुक्त करण्याचं कार्य राहिलंच होतं. विसाव्या शतकाच्या

सुरुवातीपासून भारतातील स्वातंत्र्य-चळवळीचे व नवविचारांचे वारे गोव्यात पोहोचले होते, पण चळवळीने आकार घेतलेला नव्हता, मात्र बंगाल व महाराष्ट्रातील अनेक क्रांतिकारकांना गोव्यात आश्रय लाभत होता आणि इतरही मदत लाभत होती. साधारणपणे १९२८ पासून गोवामुक्तीची चळवळ आकार घेऊ लागली आणि पोर्तूगीज सत्तेला आव्हान देऊ लागली.

१९२८ साली मुंबईत गोवा काँग्रेस समितीची स्थापना झाली.त्यानंतर पुढे गोवामुक्ती लढ्याचे शिल्पकार ठरलेल्या डॉ.टी.बी. कुन्हा यांच्या नेतृत्वाखाली गोव्यात भूमिगत कार्य सुरु झालं.

इ.स. १९३९ ते १९४५ च्या दरम्यान दुसरं महायुध्द सुरु होत.त्यामुळे पोर्तूगीजांसह सर्वच साम्राज्यवादी राष्ट्रांचं सामर्थ्य क्षीण ठरु लागलं. १९४५ नंतर एकंदर जगाचीच पुनमांडणी होऊ लागली. या पार्श्वभूमीवर, गोवा मुक्ती चळवळीने तेजस्वी रुप धारण केलं. तिथे सत्याग्रहाच्या चळवळीने जोर धरल्यावर पोर्तूगीज सत्ताधाऱ्यानी या चळवळी निर्घृणपणे मोडून काढण्याचं सत्र सुरु केलं.इकडे भारतातील स्वातंत्र्यलढा अंतिम टप्प्यात आल्यावर म्हणजे १९४६ साली काँग्रेसने गोव्याच्या स्वातंत्र्याविषयीचं धोरण स्पष्ट केलं आणि

१९४६ साली राम मनोहर लोहिया यांनी मडगाव इथे जाहीर भाषणकेल्यावर त्यांना त्वरित अटक करुन हद्दपार करण्यात आलं.त्याच प्रमाणे डॉ.कुन्हा व अनेक कार्यकर्त्यांच्या धरपकडीचंही सत्र सुरु झालं.१९४८ मध्ये डॉ.कुन्हा यांना ८ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावून त्यांना पोर्तूगालमध्ये जेरबंद करण्यात आलं. नंतर शिक्षा कमी होऊन १९५३ मध्ये ते परत आले, तेव्हा त्यांनी 'आझाद गोवा स्वतंत्र गोवा' ही वृत्तपत्र सुरू केली. वास्तविक, या सर्व संघर्षात डॉ.कुन्हांची तब्येत खालावली होती.२६ सप्टेंबर,१९५८ रोजी त्यांच निधन झालं.

गोव्यातील स्थानिक नेते व कार्यकर्त्यांवर दडपशाहीचा बडगा उगारलेला असला, तरी १९४६ ते १९६१ च्या दरम्यान गोव्यातील चळवळीच्या मदतीसाठी गोव्याबाहेर अनेक समर्थ नेते व संघटना पुढे आलेली होती, राम मनोहर लोहिया आणि त्याचप्रमाणे सांगलीचे वीर मोहन रानडे (मूळ नाव : मनोहर आपटे) सत्याग्रहीच्या माहिमा आखण्यात अग्रेसर होते.रानडे यांनी 'आझाद गोमंतक दल' या स्थानिक संघटनेच्या साह्याने गोव्यात सशस्त्र हालचाली सुरु केल्या. एका पोलीस ठाण्यावरील हल्ल्याच्या मोहिमेत ते जखमी झाले व १९६० पर्यंत त्यांना तुरुंगवासात राहावं लागलं.

गोव्या चळवळीची जी अनेक केंद्र निर्माण झाली त्यांत मुंबई हे महत्वाचं केंद्र होंत गोवामुक्ती चळवळ महाराष्ट्रातील चळवळीचा अविभाज्य घटक होती ना.ग. गोरे. शिरुभाऊ लिमये, सेनापती बापट, पीटर अल्वारिस, पंडित महादेवशास्त्री जोशी, सुधा जोशी,केशवराव जेधे असे महाराष्ट्रातील अनेक सत्याग्रही या लढ्यात उींरले, १९४९ मध्ये नॅशनल काँग्रेस व इतर पक्षांशी गोव्यातील स्वातंत्र्यसैनिकांचा निकटचा संबंध प्रस्थापित झाला. आझाद गोमंतक ला भरीव मदत लाभू लागली. असं पाठबळ लाभल्यानंच १९५४ मध्येच मुक्ती फौजेच्या स्वयंसेवकांनी दादरा-नगरवर चाल करुन जाण्याचं धाडस केलं आणि स्थानिक जनतेच्या मदतीने दादरा व नगर-हवेली भागाची मुक्तता केली.संयुक्त आघाडीचे अध्यक्ष फ्रान्सीस मस्कारन्हिस यांच्या नेतृत्वखाली स्वातंत्र्याच्या जयजयकारात तिथे भारतीय राष्ट्रध्वज फडकवला गोला.

१९५४ च्या डिसेंबर महिन्यात पुण्यात केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली गोवा विमोचन सहायक समितीची स्थापना झाली. ना.ग.गोरे व जयंतराव टिळक त्याचे कार्यवाह होते, या समितीचं जाळं अल्पावधीतच महाराष्ट्रभर पसरलं. या समितीने दोन कार्यक्रम आखले. एक म्हणजे वैयक्तिक सत्याग्रहाचा आणि दुसरा गोव्यात मोठ्या प्रमाणावर सत्याग्रहीचे जथ्थे पाठवण्याचा.

त्यानुसार १८ मे,१९५५ रोजी नानासाहेब गोरे आणि सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रही गोव्यात गेले. पण त्यांना त्वरितच अटक करण्यात आली. तरीही त्यापाठोपाठ सत्याग्रहींच्या अनेक तुकड्यांचा ओघ सुरुच राहिला. पोर्तुगीज सरकारने सत्याग्रहींना मारहाण करणं,छळ करणं किंवा त्यांना मारुन टाकणं असं दमनचक्र सुरु केलं आणि त्यात अमीरचंद गुप्ता, नित्यानंद शहा, बाबूराव थोरात आदी सत्याग्रही मृत्युमुखी पडले, पण तरीही सत्याग्रही

डगमगले नाहीत; उलट, लढा आणखी तीव्र व व्यापक झाला ९ ऑगस्ट १९५५ रोजी गोवा विमोचन समितीने काश्मीर ते कन्याकुमारी सर्व ठिकाणचे मिळून ५ हजार कार्यकर्ते १५ ऑगस्ट १९५५ रोजी गोव्यात प्रवेश करतील, अशी घोषणा केली.१५ ऑगस्ट १९५५ रोजी भाई विष्णुपंत चितळे यांच्या नेतृत्वाखालील ५०० सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीने गोव्यात प्रवेश केला, सत्याग्रहींना अमानुष मारहाण झाली.बेछूट गोळीबार झाला. त्यात केशव गोरे, हिरवे गुरुजी, रमण, त्यागीबाबा, कर्नालसिंग व त्याचप्रमाणे मंदा यालगी, कमला उपासनी,प्रभा साठे, शांता राव यांसह अनेक महिला सत्याग्रही धारातीर्थी पडल्या. या घटनेमुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. सर्वत्र हरताळ, मोर्चे सुरु झाले. त्यात कऱ्हाडचे कम्युनिस्ट नेते राजाराम पाटील आणि त्यानंतर २९ सप्टेंबर, १९५५ रोजी समाजवादी नेते ना.ग.गोरे यांना १० वर्षांची शिक्षा ठोठावली गेल्यावर तर उद्रेकात भरच पडली. या काळात आचार्य अत्रे यांनी आपल्या मदैनिक मराठाफ तून जुलमी पोर्तूगीज सरकारविरुध्द आक्रमक पवित्रा घेतला होता. १९५५ ते १९६० पर्यंत अधिकाधिक तीव्र होत गेलं.

**यशस्वी सैन्य कारवाई**

दरम्यान, पोर्तुगीज सरकारने गोवा प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे प्रयत्न सुरु केले, अमेरिका व इंग्लंड यांनी भारतावर दबाव आणणं सुरु केलं तसंच, भारताने गोव्यात सैन्य घुसवल्यास त्याचे अनिष्ट परिणाम होतील, असा इशाराही दिला. पण गोव्यातील वाढते जुलूम आणि चळवळीची तीव्रता लक्षात घेता पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी अमेरिका-इंग्लंडच्या दबावाला न जुमानता लष्करी कारवाईचा निर्णय घेतला. १७ डिसेंबर, १९६१ रोजी भारतीय सैन्याने गोव्यात सैन्य कारवाई करण्याचा निर्णय घेतला आणि ऑपरेशन विजय सुरु झालं

१८ डिसेंबर १९६१ रोजी भारतीय सैन्याने तीन बाजूंनी गोव्यात प्रवेश करण्यास सुरुवात केली . एका तुकडीने गोव्याच्या उत्तरेस असलेल्या सावंतवाडीच्या बाजूने प्रवेश केला; तर दुसऱ्या तुकडीने दक्षिणेकडील कावार भागातून कूच केलं, तिसरी कुमक पूर्वेकडील बेळगावकडून गोव्याचा ताबा घेऊ लागली, गोव्यातील जनतेने उत्स्फूर्तपणे फौजेचं स्वागत केलं; पोर्तुगीजांनी ठिकठिकाणी पेरलेल्या सुरुंगांबद्दल माहिती देऊन सैन्याला सहकार्य केलं, जवानांना पाठबळ देण्यासाठी भारतीय नौदल समुद्रकिनाऱ्यावर सज्ज झालं. भारतीय नौदलासाठी स्वातंत्र्यानंतर अशा मोहिमेसाठी सक्रियपणे सहभागी होण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

नौदलाने सैन्याला सर्व रसद पुरवण्याचं कार्य तर केलंच; पण कोंडी झालेल्या या पोर्तुगीजांनी जेव्हा स्थानिक मच्छिमारांच्या नौकांवर हल्ला केला, तेव्हा भारतीय आरमाराने पोर्तूगीजांचा चांगलाच समाचार घेऊन त्यांना निष्प्रभ केलं.

१८ डिसेंबर,१९६१ च्या संध्याकाळ-पर्यंत गोव्याच्या राजधानीचा अर्थात पणजीला सैन्याचा वेढा पडला, सैन्याची कार्यक्षम कारवाई आणि स्थानिक जनतेचं सहकार्य यामुळे पोर्तुगीज शासनाला प्रतिकाराला फारशी संधीच मिळाली नाही, अवघ्या ४८ तासांत गोव्याच्या गव्हर्नर जनरलने शरणागती पत्करली आणि गोवा मुक्त झालं, या कारवाईत भारताचे सुमारे १५ सैनिक धारातीर्थी पडले, तर पोर्तुगीजांचे त्याच्या दुपटीपेक्षा अधिक सैनिक कामी आले.

गोवामुक्तीनंतर भारतात साम्राज्यशाहीच्या ज्या उरल्यासुरल्या खुणा होत्या त्या पुसल्या गेल्या. भारतीय तिरंगा राष्ट्रध्वज गोव्यात अभिमानाने फडकवला गेला. गोवा, दीप-दमण या भागाला संयुक्तपणे केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिला गेला. पुढे १९६७ मध्ये गोव्याच्या जनतेला महाराष्ट्रात सहभागी व्हायचं आहे व स्वतंत्र घटकराज्य म्हणून दर्जा हवा, हा निर्णय घेण्यासाठी गोव्यात सार्वमत घेण्याची मुभा दिली गेली. गोव्याच्या जनतेने दुसरा पर्याय निवडला. या पर्यायाच्या कार्यवाहीस विलंब झाला, तरी पुढ १९८७ मध्ये गोवा घटक राज्य म्हणून अस्तित्वात आलं.

(साभार-असा घडला भारत)

मराठी मासिक
शिक्षणयात्री
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No. MAHMAR2015/67226

# मुलांची उपस्थिती नि सहलीचा फायदा !

**राजेंद्र विक्रम भामरे**
जि.प.शाळा दह्याणे
ता.जि.धुळे
९४०३६३९६१८



जि.प.शाळा, दह्याणे ता.जि.धुळे ही वरिष्ठ प्राथमिक शाळा धुळे तालुक्यातील लळिंग केंद्रातील आमची उपक्रमशील शाळा.शाळेत १ ते ७ वर्ग आहेत.शाळेतील नवीन आणि चांगलं देण्याची घडपड असते, आमच्या शाळेतील शिक्षकांचे एक छान कुटुंबच आहे अस म्हटलं तर वावग ठरणार नाही.आमची शाळा हि डिजीटल असून वर्गनिहाय नियोजन करुन आम्ही मुलापर्यंत नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन अध्यापन करत असतो, गुणवत्तेच्या बाबतीतही आमची शाळा अग्रेसर आहे. शाळेत वर्षभर करायच्या कामाचे सुरुवातीलाच आम्ही नियोजन करतो, वर्षभर येणाऱ्या राष्ट्रीय पुरुषांच्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या,राष्ट्रीय सन आणि उत्सव,क्रिडास्पर्धा,परिसर भेट, शैक्षणिक सहल,चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम सामान्यज्ञान स्पर्धा, गणिती स्पर्धा, विज्ञान स्पर्धा या सगळ्या गोष्टीचे वर्षभराचे नियोजन आणि त्यानुसार कार्यवाही आम्ही सगळे मिळून करत असतो.

दुसऱ्या सत्रात आम्हाला मात्र एका मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागले. गावात मोठ्या प्रमाणात लग्न असल्यामुळे विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती खूपच कमी होती. गावात जाऊन पालकभेटी घेतल्या,विद्यार्थीभेटी घेतल्या तरीही शाळेत उपस्थिती कमी होती. विद्यार्थी उपस्थिती वाढविण्यासाठी काय करावे याचा आम्ही सर्व शिक्षक विचार करत होतो. आम्ही सर्व शिक्षक एकत्र जमलो, सर्वांनी चर्चा केली. शोधला विद्यार्थी उपस्थिती वाढवण्यासाठी आम्ही मोठ्या शैक्षणिक सहलीचे नियोजन ठरवले. दोन दिवशीय सहलीचे नियोजन सर्वानी मिळून केले. वेरुळ, भद्रा मारुती, देवगिरी औरंगाबाद, पैठण, नेवासा, शनी शिंगणापूर, शिर्डी असा प्रवासाचा मार्ग ठरवला, पैठण येथे एक मुक्काम करायचे ठरवले, दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे संगीतमय परिपाठ झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सहलीची सूचना दिली. सूचना ऐकल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर कमालीचा आनंद आम्हाला दिसून आला.सहलीला जायला मिळणार हे ऐकून वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी नाचून आनंद व्यक्त केला.मधल्या सुटीत शालेय पोषण आहार खाल्ल्यानंतर घरी गेलेल्या विद्यार्थ्यांनी गावात आपल्या मित्रांना सहलीची माहिती दिली.त्यामुळे शाळेत गैहजर असलेली बरीच मुले मुली दुपारुन अचानक शाळेत हजार झालीत. आपले नियोजन यशस्वी झाल याचा आनंद आमच्या सगळ्या शिक्षकांच्या चेहऱ्यावर दिसत होता. सायंकाळी शाळा सुटल्यानंतर आम्ही काही शिक्षकांनी धुळे बस डेपोमध्ये जाऊन सहलीच्या खर्चाचा अंदाज काढला. दुसऱ्या दिवशी शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा पदमाकर चिंचोरे यांनी परीपाठानंतर सहलीची सूचना काढली. सहलीला जाण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. सहलीचे नियोजन केल्यामुळे उपस्थिती चांगलीच वाढली होती.गैहजर विद्यार्थी शाळेत येऊ लागली होती याचा आम्हाला जास्त आनंद होता. मुलांना सहलीची फी सांगण्यात आली.लांबची सहल असल्यामुळे आम्ही सर्वांनी मिळून लहान विद्यार्थ्यांना सहलीला घेतले नाही. ४५ विद्यार्थ्यांना घेऊन जाण्याचे निश्चीत झाले. आमच्या शाळेतील तंत्रस्त्रेही शिक्षक अरुण गवळे सर यांच्या मदतीने आम्ही सहलीच्या ठिकाणांची डिजीटल माहिती जमा करुन त्यावर एक लघु माहितीपट तयार करुन घेतला, विद्यार्थ्यांना डिजीटल वर्गात तो दाखवण्यात आला. विद्यार्थी ते पाहून खूपच खुश झालेत. दोन दिवशीय सहलीची तारीख निश्चीत करण्यात आली.सहलीसाठी सर्व शिक्षकांना जबाबदारी देण्यात आली मुलांसाठी पिण्याचे पाणी, जेवणाची सुविधा,औषधी,बैठकीसाठी चटया, चिवडा, झोपण्यासाठी मोठ्या पट्ट्या अशा सगळ्या गोष्टीचे नियोजन पूर्ण करण्यात आले.

सहलीच्या दिवशी सकाळी सहा वाजता आमची सहल सुरु

झाली.पहिल्यांदा शाळेची सहल निघत असल्यामुळे पालकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.आमचे विद्यार्थी तर आनंदात नाचत होते. आम्ही सर्व शिक्षकांनी कामे वाटून घेतली होती. वेरुळ येथे घृष्णेश्वर मंदिरासाठी आम्ही उतरलो.त्यानंतर वेरुळ लेणी येथे भेट दिली. तेथील माहिती घेतली.त्यानंतर भद्रा मारुती दर्शन घेऊन आम्ही सगळ्यांनी दुपारचे जवण केले. जेवणानंतर विद्यार्थ्यांनी नाचण्याचा आणि गाण्याचा आनंद घेतला. त्यानंतर आम्ही जवळच दौलताबाद किल्यावर भेट दिली. प्राचीन साम्राज्याची माहिती देणारा हा किल्ला मुलांना खूपच आवडला, त्यांनतर आम्ही औरंगाबाद येथे सिध्दार्थ उद्यानाला भेट दिली.तेथील प्राणी संग्रहालय, मात्सालय येथील विविध प्रकारचे माशे आणि प्राणी पाहून विद्यार्थी खूपच खुश झालीत. तेथून आम्ही पैठण कडे निघालो. रात्रीची वेळ होती.ज्ञानेश्वर उद्यानातील संगीतमय कारंजा पाहणे हा खूपच आनंदाचा अनुभव होता. विद्यार्थी कारंजाच्या सोबत मनसोक्त नाचलेत. रात्री जेवण करुन आम्ही सगळे दिवसभरच्या आठवणी काढत झोपून गेलो.

दुसऱ्या दिवशी आम्ही सकाळी लवकर तयार झालो. सकाळी जायकवाडी प्रकल्प पाहण्यासाठी आम्ही पोहचलो,त्यानंतर सगळ्यांनी नाश्ता घेतला. तेथून आम्ही नेवासेकडे निघालो, नेवास्याला मंदिरचे दर्शन घेऊन आम्ही शनिशिंगणापूर कडे निघालो दर्शन घेतल्यानंतर आम्ही एकत्र दुपारचे जेवण केले. जेवनांतर आम्ही खरेदी केली. त्यानंतर शिर्डीकडे निघालो.शिर्डीला साईबाबांच्या समधीचे दर्शन घेऊन आम्ही आमच्या परतीच्या प्रवासाला निघालो.रात्री ११ वाजता आम्ही सहलीहून सूखरुप आमच्या दह्याण्याला पोहचलो. आम्हा सगळ्यांना भरभरुन आनंद देणारी अशी हि सहल आम्हाला कायम स्मरणात राहील. या सहलीचा आम्हाला दुसऱ्या दिवशी खूप फायदा झालेला दिसला. सहलीमुळे शाळेत न येणारी मुलेही नियमितपणे शाळेत येऊ लागलीत. अश्याप्रकारे आमच्या शाळेतील मुलांची उपस्थिती वाढवणारी हि सहल आम्हाला खूपच आवडली. विद्यार्थी उपस्थिती वाढल्यामुळे आम्हा शिक्षकांनाही समाधान वाटले.

# तंत्रज्ञानाच्या मदतीने...



**सत्यवान सहदेव शिरसाठ**
जि.प.शाळा लाकड्या हनुमान
शिरपूर जि.धुळे
९७०२०२६५१२

हातामध्ये सुर्यमाला घेऊन आनंदायी अध्ययन-अध्यापन.

तंत्रज्ञानाचा वापर करुन अध्यापन कार्य केल्यास विद्यार्थ्यांना विविध अवघड( अमुर्त) संकल्पना सहजपणे समजण्यास मदत होते. .सुर्यमाला हा घटक शिकविताना बऱ्याचदा शिक्षकांना अडचणी येतात फक्त चित्रांचा आधार घेऊन पुस्तक वापरुन किंवा साधे शैक्षणिक. साधन वापरुन सुर्यमाल हा घटक विद्यार्थ्यांना पुर्णपणे १०० % समजणार नाही.मुलांना तो घटक फार अवघड वाटेल..सुर्यमाला ही अमृर्त व प्रत्यक्षात न दाखविता येणारी सकल्पना आहे..परंतु तंत्रज्ञानाचा वापर करुन सुर्यमाला आपल्या वर्गात, व विद्यार्थ्यांच्या हातामध्येच उपलब्ध करुन दिल्यास त्याव्दारे संपूर्ण सुर्यमाला समजविल्यास, अध्यापन केल्यास विद्यार्थी सुर्यमाला हा घटक व त्याची प्रक्रिया कधीच विसरणार नाहीत..!

प्ले स्टोअरवर उपलब्ध असलेल्या एक्सप्लोरर फॉर मर्ज क्यूब या ॲपच्या माध्यमातून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लाकड्याहनुमान या शाळेतील मुलांनी एक अनोख्या पध्दतीने सुर्यमाला अनुभवली..!! त्यामधील ग्रह,उपग्रह, कक्षीय गती, रंग आदी संकल्पना समजून घेतल्या, आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानक पाहून वेगवेगळे प्रश्नही विचारले..!! नक्कीच यामधून विद्यार्थ्यांना काहीतरी वेगळे शिकायला मिळाले याचा मनस्वी आनंद आम्हाला आहे.!! तर मग चला तंत्रज्ञान समजुन घेऊया..शिक्षण सोपे करुया...

तंत्रज्ञानाचा वापर करुन सुर्यमाला वर्गात, विद्यार्थ्यांच्या हातात दाखवण्यासाठी पुढिल प्रमाणे कृती समजुन घेऊया..आपण ही आपल्या शाळेत हा अनुभव देऊ शकता..

Galatic Explorer install करणे व वापरण्याची पध्दत...

१) Google App store मधून Galatic Explorer app install करा२) App च्या माहितीमधील need a cube या लिंक ला स्पर्श करा try it आणि buy it असे दोन option दिसतील try it ला स्पर्श करुन ाशीसश र्लीलश ची प्रिंट मिळवा (buy it स्पर्श केला तर amazon वर redirect होऊन २५१९.००/रुपये अशी किंमत दिसेल. त्यामुळे buy it click करु नका)३) download झालेल्या PDF च्या प्रिंट पासून Merge Cube (घन आकार) तयार करा.४) घन आकार cube तयार झाल्यास explorer App मधून Phone Mode ला स्पर्श करुन cube (घन) टेबलावर ठेवुन किंवा विद्यार्थ्यांच्या हातात देऊन scan करावा. आता तुम्ही तुमच्या हातात सुर्यमाला घेऊ शकता.. व विद्यार्थ्यांच्या हाताततही देऊ शकता..यात सर्वात महत्वाची बाब म्हणजे merge cube फक्त Download करुन नव्हे तर त्याची प्रिंट काढून त्या प्रिंटचा स्वत:च्या हातानी cube (घन आकार) तयार करावा लागेल.

आता तंत्रज्ञान शिक्षणात आले हो, अवघड सोपे झाले हो..

